cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७६ | शुक्रवार दि.०५ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### युवकांचा असंतोष,नव्या राजकारणाची चाहूल...

भारतीय राजकारणात अनेकदा असे क्षण येतात जे वरकरणी किरकोळ वाटतात; परंतु काळाच्या ओघात ते व्यापक सामाजिक बदलांची नांदी ठरतात. गेल्या काही दिवसांत अभिजीत दीपके आणि त्यांच्या ''कॉक्रोच जनता पार्टी'' या अनोख्या नावाच्या उपक्रमाभोवती निर्माण झालेली चर्चा अशाच एका घडामोडीकडे निर्देश करत आहे. या चळवळीची व्याप्ती, तिचा प्रभाव किंवा तिचे भवितव्य याबाबत आज निश्चित भाष्य करणे अवघड असले, तरी देशातील युवकांच्या मानसिकतेत होत असलेल्या बदलांचे हे एक महत्त्वाचे प्रतिबिंब मानावे लागेल.

# कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी आधी थकीत रक्कम भरा

## २०१९ च्या लाभार्थ्यांना केवळ ५० हजारांचीच सवलत

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' मंजूर केली असली, तरी या योजनेतील काही अटींमुळे अनेक शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: २०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकारच्या काळात दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना यावेळी केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**




मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली. त्यानंतर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने यासंदर्भातील शासन आदेश जारी केला. सरकारने जाहीर केलेल्या नव्या योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्यात येणार आहे. मात्र, यापूर्वीच्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना मर्यादित लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने शेतकरी संघटनांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. योजनेतील सर्वात महत्त्वाची अट म्हणजे, ज्या शेतकऱ्यांचे थकीत कर्ज दोन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांनी प्रथम दोन लाखांवरील संपूर्ण थकीत रक्कम बँकेत जमा करणे आवश्यक राहणार आहे. त्यानंतरच त्यांना एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की, १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत घेतलेले पीक किंवा मुदत कर्ज ३० नोव्हेंबर २०२५ रोजी थकीत असावे आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नसावी. अशा कर्जदार शेतकऱ्यांनाच योजनेचा लाभ मिळणार आहे. सरकारने अतिरिक्त थकीत रक्कम भरण्यासाठी मार्च २०२७ पर्यंतची मुदत दिली आहे. मात्र, तोपर्यंत नवीन

### खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची कोंडी

सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असून बहुतांश शेतकरी जून महिन्यात जुने कर्ज फेडून नवीन पीककर्ज घेत असतात. अशा वेळी सरकारने कर्जमाफी जाहीर केली असली, तरी आधी अतिरिक्त थकीत रक्कम भरण्याची अट घातल्यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. एका बाजूला खरीप हंगामासाठी बियाणे, खते, औषधे आणि शेती मशागतीसाठी पैशांची गरज आहे, तर दुसऱ्या बाजूला कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी बँकेत अतिरिक्त रक्कम जमा करण्याची अट आहे. त्यामुळे उपलब्ध निधी शेतीसाठी वापरायचा की कर्जफेडीसाठी, असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

कर्ज घेण्याची आवश्यकता असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही अट अडचणीची ठरू शकते. कारण, अतिरिक्त रक्कम न भरल्यास कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही आणि नव्या कर्जासाठीही अडथळे निर्माण होऊ ▶▶ पान २ वर

# मराठा आरक्षाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पालाईन

## मंत्रालयातूनही मार्गदर्शन; मनोज जरांगेंच्या आंदोलनाची दखल

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासंदर्भात मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर राज्य सरकारने जी आश्वासने दिली होती; त्याची पूर्तता करण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत. मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. तसेच आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदींबाबत नागरिकांना सहाय्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे.

प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातील कार्यालयात ९३२६५६२८१५ हा हेल्पलाईन क्रमांक



सुरू करण्यात आला आहे. यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल, अशी माहिती मंत्री आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिली. या बैठकीवेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव - पाटील, आमदार प्रसाद लाड, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मराठा आरक्षणाच्या प्रश्नी दिलेल्या आश्वासनांची पुर्तता निर्धारित वेळेत करण्यासाठी सर्व विभागांनी प्रशासकीय स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरु करावी. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलतेने निर्णय होण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी गांभिर्याने काम करावे. हलगर्जीपणा ▶▶ पान २ वर

### न्यायमूर्ती शिंदे समितीला मुदतवाढ

न्यायमूर्ती शिंदे समितीला ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्री मंडळ उपसमितीने घेतला आहे. सारथी समितीमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संस्थेचे बळकटीकरण करण्यावरही चर्चा झाल्याचे सांगण्यात आले आहे.

## मराठा आरक्षण आंदोलन

### बीड जिल्ह्यातील १५ मृतांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख

बीड । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी झालेल्या आंदोलनादरम्यान आत्महत्या केलेल्या किंवा मृत्युमुखी पडलेल्या बीड जिल्ह्यातील १५ आंदोलकांच्या कायदेशीर वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी १० लाख रुपये, याप्रमाणे एकूण १ कोटी ५० लाख रुपयांचे अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या संदर्भातील अधिकृत पत्र मंत्रालयातून बीडच्या जिल्हाधिकार्यांना पाठवण्यात आले आहे.

शासनाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालाच्या आधारे मुख्यमंत्री महोदयांनी ही मदत मंजूर केली आहे. यामध्ये कृष्णा श्रीमंत अलगुडे रा. दिमाखवाडी, ता. गेवराई. नितीन माणिक चव्हाण रा. सुगाव, ता. अंबाजोगाई. रामेश्वर कारभारी मतेरा. गंगावाडी ▶▶ पान २ वर

# कर्जमुक्तीच्या अटी दिलासासाठी की, कर्जाचा विळखा घटट् करण्यासाठी–विजय वडेट्टीवार

मुंबई । प्रतिनिधी

महायुती सरकारची कर्जमाफी योजना म्हणजे शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक आहे. यात सरकारने टाकलेले अटी शर्तींचे जाळे पाहिले तर ही योजना शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आहे की त्यांच्याभोवती कर्जाचा विळखा अधिक घट्ट करण्यासाठी आहे हा प्रश्न पडतो, असे काँग्रेस नेते वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले की, १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले पीक कर्ज, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असेल आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड केलेली नसेल, तरच दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी मिळणार आहे. म्हणजेच ज्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्ज फेडले, त्यांना शिक्षा आणि ज्यांचे कर्ज थकीत राहिले, त्यांनाच लाभ मिळणार आहे. सरकारने घातलेल्या या अटी शेतकऱ्यांमध्ये प्रामाणिक कर्जफेडीला प्रोत्साहन देणाऱ्या नाहीत, तर उलट कर्ज थकवण्यास प्रोत्साहन देणाऱ्या आहेत.



अनेक शेतकऱ्यांनी रक्ताचं पाणी करून पिकांचे नुकसान, बाजारभावातील घसरण आणि वाढत्या उत्पादन खर्चाच्या संकटातही कर्ज फेडण्याचा प्रयत्न केला. त्यांना या कष्टाचे बक्षीस द्यायचे सोडून शिक्षा का? असा सवालही यावेळी केला. कर्जमाफी ही शेतकऱ्यांच्या संकटातून सुटका करण्यासाठी असते, जाचक अटी लादून त्यांना अधिक मोठ्या संकटात टाकण्यासाठी नाही. ज्या शेतकऱ्यांची थकीत रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांनी आधी दोन लाखांवरील संपूर्ण रक्कम बँकेत भरावी, मगच दोन लाखांची कर्जमाफी मिळेल अशी अट या योजनेत घालण्यात आली आहे. आधीच अस्मानी सुलतानी संकटाने पिचलेल्या शेतकरी ही रक्कम कुठून आणणार याचा विचार सरकारने केलेला नाही असा आरोपही यावेळी केला. विजय वडेट्टीवार म्हणाले, अजून एक अन्यायकारक अट म्हणजे महाविकास आघाडीच्या काळात महात्मा जोतिराव फुले कर्जमाफी योजनेचा लाभ मिळालेल्या तब्बल १२ लाख ७१ हजार शेतकऱ्यांना २ लाखांची कर्जमाफी न देता त्यांची केवळ ५० हजारांवर बोळवण करण्यात आली आहे. ही अट शेतकऱ्यांशी भेदभाव करणारी, त्यांच्यावर अन्याय करणारी आहे. २०१७ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या ▶▶ पान २ वर

# देशात आणीबाणी लागणार;मोदी वर्षभरात पंतप्रधानपद सोडणार

## राहुल गांधींच्या दाव्याने खळबळ

दिल्ली । वृत्तसंस्था

काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत अत्यंत धक्कादायक दावे करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. एका कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी यांनी पुढील एका वर्षात नरेंद्र मोदी पंतप्रधानपदावर राहणार नाहीत, असा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच देशात मोठे आर्थिक संकट येण्याची आणि लोकांच्या विरोधामुळे आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यताही त्यांनी



व्यक्त केली.

कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी म्हणाले की, देशातील परिस्थिती वेगाने बदलत आहे आणि सत्ताधाऱ्यांच्या नियंत्रणातील व्यवस्था आता ढासळू लागली आहे. त्यांच्या मते, सरकारच्या आतूनच संस्थात्मक पातळीवर विरोध सुरू झाला असून विविध यंत्रणांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. राहुल गांधी यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेबाबतही गंभीर इशारा दिला. त्यांच्या मते, केंद्र सरकारने अर्थव्यवस्थेला संरक्षण देणाऱ्या अनेक महत्त्वाच्या यंत्रणा कमकुवत केल्या आहेत. त्यामुळे आगामी काळात देशाला मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो. ते म्हणाले, ''देशात अशी आर्थिक त्सुनामी येणार आहे, जी लोकांनी यापूर्वी कधीच पाहिलेली नाही. अर्थव्यवस्थेचे संरक्षण करणारे कवचच काढून टाकण्यात आले आहे.'' राहुल गांधी यांनी दावा ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### विधानपरिषदेच्या १७ पैकी ५ जागा बिनविरोध

मुंबई: महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघाच्या १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. उमेदवारी अर्ज मागं घेण्याच्या दिवशी राज्यभरात मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. राज्यातील सत्ताधारी महायुतीच्या उमेदवारांसमोर महाविकास आघाडीनं आव्हान उभं करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मविआच्या काही उमेदवारांनी संख्याबळाचं कारण, मित्रपक्षांचं सहकार्य मिळत नसल्याचा आरोप करत माघार घेतली. तर, महायुतीच्या नेत्यांना देखील बंडखोरांना शांत करण्यात यश आलं. नितेश राणे थेट ठाकरेंच्या शिवसेनेचे कोकण विधानपरिषदेचे उमेदवार बाळ माने यांना अर्ज मागं घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. तर, नाशिकमध्ये गोकुळ गीते अर्ज माघारीवरुन चर्चेत राहिले, तर गणेश गीते यांनी सकाळीच अर्ज मागं घेणार असल्याचं स्पष्ट केलं. अर्ज माघारीच्या दिवशी पाच जागा बिनविरोध झाल्या, यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस आणि एका जागेवर भाजपनं बिनविरोध विजय मिळवला.

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते थोपटे यांचे निधन

पुणे: राज्याच्या राजकारणातील ज्येष्ठ आणि अनुभवी काँग्रेस नेते, माजी मंत्री तथा भोरचे माजी आमदार अनंतराव थोपटे यांचे गुरुवारी निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. अल्पशा आजाराने उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने राज्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. अनंतराव थोपटे यांनी भोर विधानसभा मतदारसंघाचे अनेक वर्षे प्रतिनिधित्व केले. ग्रामीण भागातील जनतेशी असलेला त्यांचा घट्ट संपर्क, विकासकामांबाबतची बांधिलकी आणि संघटन कौशल्य यामुळे ते लोकप्रिय लोकनेते म्हणून ओळखले जात होते. त्यांनी राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून काम पाहिले असून पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपदही भूषविले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर काँग्रेस पक्षाच्या विधिमंडळ गटाचे नेतृत्व करण्याची जबाबदारीही त्यांनी सांभाळली. पुणे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. पक्षनिष्ठा, संयमी नेतृत्व आणि सर्वसमावेशक राजकारण यासाठी त्यांचा राजकीय वर्तुळात विशेष आदर होता.

### कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला सेनेचा पाठिंबा?

मुंबई: दिल्लीतील जंतर-मंतर येथे ६ जून रोजी होणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाची देशभरात चर्चा सुरू असतानाच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी या आंदोलनाबाबत महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. आंदोलनाला थेट पाठिंबा जाहीर न करताही त्यांनी अशा चळवळींना शुभेच्छा दिल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले आहे. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासह विविध मुद्द्यांवर आंदोलनाची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर माध्यमांशी बोलताना संजय राऊत यांना कॉकरोच जनता पार्टीला शिवसेनेचा पाठिंबा आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना राऊत म्हणाले की, कॉकरोच जनता पार्टी हा एक स्वतंत्र पक्ष किंवा संघटना आहे, ती एक चळवळ आहे. देशातील विविध प्रश्नांबाबत चिंता व्यक्त करणारे अनेक लोक कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसतात. तरीही ते सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांवर आवाज उठवत असतात.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०४ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९२.०० क्विंटल | २,२५० | २,५०१ | २,३२६ |
| ज्वारी/हायब्रिड: १२७.०० क्विंटल | १,७५१ | ४,२९८ | २,९०१ |
| मका/लोकल: ३०.०० क्विंटल | २,०१८ | २,०१८ | २,०१८ |
| तूर : १४.५० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: १०९.५० क्विंटल | २,००० | २,४८१ | २,२५३ |
| मुग: ८.०० क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ५,४५१ | ५,६०० | ५,५५० |

# मॉन्सून २ दिवसांत महाराष्ट्रात

## केरळमध्ये धडक, कर्नाटकातही एंन्ट्री, राज्यात ५ दिवस पावसाचा अंदाज

मुंबई । प्रतिनिधी

**मॉन्सूनने गुरूवारी संपूर्ण केरळ व्यापत कर्नाटकपर्यंत मजल मारली आहे. मॉन्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान असून २ ते ३ दिवसांमध्ये मॉन्सून महाराष्ट्रात दाखल होईल. तसेच राज्यातील अनेक भागात पुढील ५ दिवस वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.**



मॉन्सूनने मोठी झेप घेत कर्नाटकपर्यंत मजल मारली. संपूर्ण केरळ व्यापले. तसेच सपूर्ण लक्षद्वीप बेटे, आग्नेय आणि नैऋत्य अरबी समुद्र, कोमोरिनचा भाग व्यापला आहे. तमिळनाडूच्याही काही भागात मॉन्सूनने आज प्रगती केली आहे. मॉन्सूनची सीमा आज कर्नाटकतील मंगलोर, तमिळनाडूतील उथागमंडलम, कोडाईकनल आणि थुथूकुडी भागात होती. मॉन्सूनच्या प्रगतीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील २ ते ३ दिवसांमध्ये मॉन्सून संपूर्ण गोवा राज्य व्यापून महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. तर राज्यातील अनेक भागात पुढील ५ दिवस पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. राज्यातील बहुतांशी भागात वादळी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा अंदाज आहे. आज यवतमाळ जिल्ह्यात तर उद्या अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. शनिवारी कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यात तर मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि मराठवड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात काही भागात वादळी पावसाचा अंदाज आहे. तर या भागातील इतर जिल्ह्यांमध्ये ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यात वादळी पावसाचा अंदाज आहे. ▶▶ पान २ वर

### आघाडीच्या बैठकीकडे डिएमकेने फिरवली पाठ

चेन्नई । वृत्तसंस्था

**तामिळनाडूमध्ये थलपती विजय यांच्या सरकारमध्ये काँग्रेस सामील झाल्यानंतर, डीएमकेने विरोधी पक्षांच्या ऐक्याला मोठा धक्का दिला आहे. ८ जून रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या आघाडीच्या बैठकीपासून डीएमकेने अंतर राखले आहे. निवडणूक निकालानंतर काँग्रेसने डीएमकेसोबत जो विश्वासघात केला, त्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते अजूनही प्रचंड दुखावलेले आहेत, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे.**

गेल्या महिन्यात जाहीर झालेल्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या निकालात विजय यांच्या टीव्हीके पक्षाने चमकदार कामगिरी करत १०८ जागा जिंकल्या, ज्यामुळे डीएमकेला आपली सत्ता गमवावी लागली. यानंतर काँग्रेसने सर्वात आधी टीव्हीकेला पाठिंबा देण्याची घोषणा केली. त्यानंतर डाव्या पक्षांसह इतर छोट्या पक्षांनी आणि एआयएडीएमकेच्या आमदारांनीही विजय यांच्या बाजूने मतदान केले. ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# युवकांचा असंतोष, नव्या राजकारणाची चाहूल...

भारतीय राजकारणात अनेकदा असे क्षण येतात जे वरकरणी किरकोळ वाटतात; परंतु काळाच्या ओघात ते व्यापक सामाजिक बदलांची नांदी ठरतात. गेल्या काही दिवसांत अभिजीत दीपके आणि त्यांच्या ''कॉक्रोच जनता पार्टी'' या अनोख्या नावाच्या उपक्रमाभोवती निर्माण झालेली चर्चा अशाच एका घडामोडीकडे निर्देश करत आहे. या चळवळीची व्याप्ती, तिचा प्रभाव किंवा तिचे भवितव्य याबाबत आज निश्चित भाष्य करणे अवघड असले, तरी देशातील युवकांच्या मानसिकतेत होत असलेल्या बदलांचे हे एक महत्त्वाचे प्रतिबिंब मानावे लागेल.

गेल्या दशकभरात भारतीय राजकारणात मोठी स्थित्यंतरे झाली. २०१४ नंतर केंद्रात सत्तेवर आलेल्या नेतृत्वाने देशाच्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदूच बदलून टाकला. मजबूत नेतृत्व, राष्ट्रवाद, विकास, डिजिटल भारत, भ्रष्टाचारविरोधी भूमिका अशा अनेक मुद्द्यांवर जनतेने विश्वास दाखवला. या परिवर्तनात युवकांचा सहभाग निर्णायक होता. सोशल मीडियावर सक्रिय असलेली तरुण पिढी या बदलाची वाहक बनली. मात्र, काळ जसजसा पुढे सरकत गेला तसतशा अपेक्षा आणि वास्तव यांच्यातील अंतरही अनेकांना जाणवू लागले.

आज बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा घोटाळे, शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी, महागाई, आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक विषमता यांसारख्या प्रश्नांमुळे युवकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. या अस्वस्थतेला अद्याप संघटित राजकीय रूप मिळालेले नसले तरी त्याची चिन्हे अनेक ठिकाणी दिसून येत आहेत. अभिजीत दीपके यांची लोकप्रियता किंवा त्यांना मिळणारा प्रतिसाद याच पार्श्वभूमीवर पाहावा लागेल.

विशेष म्हणजे त्यांच्या जाहीरनाम्यातील मागण्या या क्रांतिकारक किंवा व्यवस्थाविरोधी स्वरूपाच्या नाहीत. शिक्षण क्षेत्रातील उत्तरदायित्व, न्यायव्यवस्थेची स्वायत्तता, पक्षांतरावरील नियंत्रण आणि महिलांना अधिक प्रतिनिधित्व यांसारख्या मागण्या या प्रत्यक्षात लोकशाही अधिक सक्षम करण्याच्या दिशेने जाणाऱ्या आहेत. या मागण्यांशी सहमत किंवा असहमत होता येईल; परंतु त्या चर्चेस अयोग्य आहेत असे म्हणता येणार नाही. लोकशाहीमध्ये अशा मागण्यांना स्थान असते आणि त्यावर सार्वजनिक चर्चा होणे आवश्यक असते. या संपूर्ण घडामोडीचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न. एखाद्या व्यक्तीचे विचार पटोत अथवा न पटोत, त्याला ते मांडण्याचा घटनात्मक अधिकार आहे. सोशल मीडिया अकाउंट्स बंद होणे, धमक्या मिळणे, वैयक्तिक माहिती सार्वजनिक करणे अशा घटना खऱ्या असतील तर त्या कोणत्याही लोकशाही व्यवस्थेसाठी चिंतेचा विषय आहेत. विचारांना उत्तर विचारांनीच दिले पाहिजे; दडपशाही किंवा भीतीचे वातावरण निर्माण करून नव्हे.

६ जून रोजी दिल्लीत होणाऱ्या प्रस्तावित आंदोलनाकडे त्यामुळे केवळ एका व्यक्तीच्या कार्यक्रमाच्या स्वरूपात पाहणे चुकीचे ठरेल. त्यामागे युवकांच्या अपेक्षा, असंतोष आणि नव्या राजकीय अभिव्यक्तीची गरज दडलेली आहे. आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळेल की नाही, हे भविष्यात स्पष्ट होईल. परंतु या आंदोलनाने एक चर्चा नक्कीच सुरू केली आहे. आजचा भारतीय युवक नेमके काय शोधत आहे? जगभरातील अनेक देशांमध्ये गेल्या काही वर्षांत युवकांनी राजकीय बदलांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सोशल मीडियामुळे संघटन करणे, विचार पोहोचवणे आणि जनमत घडवणे अधिक सोपे झाले आहे. पारंपरिक राजकीय पक्षांच्या चौकटीबाहेरही नेतृत्व निर्माण होऊ शकते, हे अनेक उदाहरणांतून दिसून आले आहे. भारत याला अपवाद राहील असे मानण्याचे कारण नाही.

सरकारसमोरही या निमित्ताने मोठे आव्हान उभे राहिले आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे आवश्यक असले तरी लोकशाही हक्कांवर मर्यादा आणणे हा दीर्घकालीन उपाय ठरू शकत नाही. उलट शांततापूर्ण आंदोलनांना परवानगी देणे, संवादाची दारे खुली ठेवणे आणि मतभिन्नतेचा आदर करणे हे लोकशाही व्यवस्थेचे सामर्थ्य दर्शवते. कोणत्याही सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की असंतोष दडपून टाकता येतो; पण संपवता येत नाही. इतिहास साक्ष देतो की समाजातील असंतोषाला जर लोकशाही मार्ग उपलब्ध झाला तर तो सकारात्मक परिवर्तनाचे कारण ठरतो. मात्र त्याच असंतोषाला अभिव्यक्तीची संधी नाकारली गेली तर तो अधिक तीव्र स्वरूप धारण करू शकतो. म्हणूनच सरकार आणि आंदोलनकर्ते या दोघांनीही संयम, जबाबदारी आणि घटनात्मक चौकटीचे भान राखणे आवश्यक आहे.

६ जून हा दिवस कदाचित भारतीय राजकारणातील एखादा मोठा टर्निंग पॉइंट ठरेल किंवा कदाचित तो केवळ एक सामान्य आंदोलनाचा दिवस ठरेल. परंतु त्यातून उपस्थित झालेले प्रश्न मात्र महत्त्वाचे आहेत. देशातील युवकांची वाढती अस्वस्थता, राजकीय व्यवस्थेबद्दलचा अविश्वास, उत्तरदायित्वाची मागणी आणि नव्या नेतृत्वाचा शोध या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. लोकशाहीमध्ये सरकारे येतात आणि जातात, पक्ष बदलतात, नेतृत्व बदलते; पण जनतेचा आवाज कायम राहतो. त्या आवाजाला ऐकून घेण्याची तयारी हीच कोणत्याही लोकशाहीची खरी ताकद असते. आज भारतासमोर उभे असलेले खरे आव्हान अभिजीत दीपके किंवा त्यांच्या आंदोलनाचे नाही; तर देशातील युवकांच्या मनातील प्रश्नांना विश्वासार्ह उत्तर देण्याचे आहे. कारण इतिहास सांगतो, जेव्हा युवक बदलाची मागणी करतात, तेव्हा समाज आणि व्यवस्था या दोघांनाही त्याची दखल घ्यावीच लागते.

## बीडमध्ये अन्न व औषध प्रशासनाचे धाडसत्र; भेसळखोरांचे धाबे दणाणले!

विशेष तिनिधी । बीड

**राज्याच्या अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती होताच त्यांच्या कडक कार्यशैलीचा दणका आता बीड जिल्ह्यातही जाणवू लागला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या अन्न व औषध क्षेत्रातील अनियमितता, भेसळ आणि निकृष्ट दर्जाची उत्पादने विकणाऱ्यांवर आयुक्त मुंढेंच्या थेट निर्देशानंतर बीड जिल्हा प्रशासनाने धडक तपासणी मोहीम तीव्र केली आहे.**

या धडक मोहिमेमुळे बीड जिल्ह्यातील हॉटेल व्यावसायिक, मिठाई विक्रेते आणि औषध दुकानदारांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीड, पाटोदा, केज आणि जिल्ह्यातील इतर प्रमुख भागांत अन्न व औषध प्रशासनाच्या पथकांनी अचानक भेटी देत तपासणी सुरू केली आहे. जिल्ह्यातील मिठाई दुकाने, बेकरी, हॉटेल्स, दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्रे आणि थंड पेय विक्रेत्यांच्या आस्थापनांवर थेट धाडी टाकण्यात येत आहेत. संशयास्पद अन्नपदार्थांचे नमुने संकलित करून ते विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवले जात आहेत. गुणवत्ता आणि परवान्यांची पडताळणी: व्यावसायिक अन्नपदार्थांची साठवणूक कशी करतात, तिथे स्वच्छता आहे की नाही, तसेच त्यांच्याकडे वैध परवाने उपलब्ध आहेत का, याची कडक तपासणी केली जात आहे. किरकोळ त्रुटी असणाऱ्यांना तात्काळ सुधारणेच्या सूचना दिल्या जात असून गंभीर उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईची टांगती तलवार आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली २५ मे ते ३१ मे २०२६ दरम्यान संपूर्ण राज्यात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत बीड जिल्ह्याचाही समावेश होता. या राज्यव्यापी मोहिमेत एकूण ७३ आस्थापनांची तपासणी करून खवा, खाद्यतेल, तूप, बेकरी पदार्थ आणि मिठाई यांसारखा कोट्यवधी रुपयांचा संशयास्पद व निकृष्ट अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे, ज्यामध्ये बीडमधील तपासणी सत्राचाही मोठा वाटा आहे. महत्त्वाची सूचना: अन्न किंवा औषधांमध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ किंवा गैरप्रकार आढळल्यास नागरिक थेट खालील अधिकृत क्रमांकावर तक्रार नोंदवू शकतात: टोल फ्री क्रमांक: १८००२२२३६५ ई-मेल आयडी: -. jc-foodhq@gov.in बीड जिल्ह्यात प्रशासनाने सुरू केलेल्या या धडक सत्रामुळे अनेक व्यापाऱ्यांनी स्वतःहून नियमांचे पालन करण्यास आणि स्वच्छतेची काळजी घेण्यास सुरुवात केली आहे. आगामी काळात ही मोहीम अधिक तीव्र होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## वक्फ मंडळाचे अद्यावत संग्रहालय पुन्हा पर्यटकांच्या सेवेत सुरू -समीर काझी

छ. संभाजी नगर । प्रतिनिधी

**ऐतिहासिक पाणचक्की येथील संग्रहालय अद्यावत करण्यात आले असून ते पुन्हा देश-विदेशातील पर्यटकांसाठी खुले करण्यात आले आहे.राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या उपस्थित सुरू करण्यात आले आहे.पाणचक्की येथे राष्ट्रीय स्तराचे वाचनालय ही जनतेच्या सेवेत लवकरच सुरू करण्यात येईल,विविध विषयातील तब्बल एक हजार पुस्तकांचा खजिना जमा केला जाणार आहे, अशी माहिती ही या वेळी समीर काझी यांनी दिली.**



हजरत बाबाशाह मुसाफिर यांचे तब्बल तीनशे वर्षांपूर्वी येथे वास्तव्य होते,त्यांनी धार्मिक व राष्ट्रीय एकात्मतेचे महत्वपूर्ण कार्य केले,त्यांची शिकवण नव्या पीडिला मिळावी,असा उद्देश ही समीर काझी यांनी बोलून दाखविला.संग्रहालयात काबा शरीफ व मदिना मुनवरा येथील गिलाफ,तसेच बाबाशाह मुसाफिर यांनी आपल्या जीवनात ज्या वास्तूंचा उपयोग केला,अश्या अनेक वास्तू संग्रहालयात ठेवण्यात आल्या आहेत.पाणचक्की या ठिकाण एकेकाळी देश विदेशातील धार्मिक व सामाजिक विद्वानांनी लिहिलेली पुस्तकांची मोठं वाचनालय म्हणून प्रसिद्ध होते,सध्या तब्बल दोन हजार हस्तलिखित पुस्तकांचा खजिना आहे,लवकरच अशी दुर्मिळ पुस्तके देशभरातून जमा केली जाणार आहे,हे वाचनालय नवीन पीडित विद्यार्थी व संशोधकांना लाभदायक ठरणार आहे,त्यावर आमचे काम सुरू असल्याचेही समीर काझी यांनी सांगितले.या वेळी मंडळाचे सदस्य एयु पठाण,हसनैन शाकिर, इफतेखार हाश्मी,मुख्यकार्यकारी अधिकारी फैयाज खान,उपमुख्यकार्यकरी अधिकारी मुशीर अहमद शेख,विशेष अधीक्षक खुसरोखान व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.


### वाचनालयातील पुस्तक आता ऑनलाईन

वक्फ मंडळाच्या वाचनालायतील पुस्तके आता ऑनलाईन उपलब्ध होणार आहे.गोरगरीब व होतकरू विद्यार्थ्यांना जे शहरात येऊ शकत नाही किंवा संशोधनासाठी पुस्तके खरेदी करू शकत नाही,त्या विद्यार्थ्यांना ही मोठी संधी असणार आहे यात सुफीनिझम बाबत अनेक प्रकाशित पुस्तकेही उपलब्ध असणार आहे,विविध विषयांवरील पर्शियन,उर्दू व अरेबिक पुस्तक ही उपलब्ध करून देण्यात येईल असा मानस मंडळाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी मुशीर अहमद शेख यांनी व्यक्त केला.तसेच पैगंबर साहेबांच्या मोहे मुबारकचे दर्शन श्रद्धालुना आता मोहरमच्या एक ते दहा तारखे पर्यंत करता येणार आहे.अशी माहिती ही या वेळी देण्यात आली.

## संकेत सानप यांना आधार फाउंडेशन राज्यस्तरीय 'समाजभूषण पुरस्कार

अहिल्यानगर ।

**''समाजहितासाठी झटणाऱ्या युवा कार्यकर्त्याच्या सेवेला राज्यस्तरीय मानाचा पुरस्कार आरोग्य व समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरीय दखल; संकेत सानप यांना ''समाजभूषण पुरस्कार २०२६'' जाहीर!**



समाजसेवेचा गौरव... आरोग्य क्षेत्रातील कार्याचा सन्मानआदर्श तिगावचे युवा समाजसेवक संकेत सुमन तुकाराम सानप यांना आधार फाउंडेशनचा राज्यस्तरीय ''समाजभूषण पुरस्कार २०२६'' जाहीर झाला असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आरोग्य जनजागृती, समाजसेवा, गरजू नागरिकांना मदत, विविध लोकहिताच्या मोहिमा तसेच वंचित आणि दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी सातत्याने कार्य करणारे युवा समाजसेवक संकेत सुमन तुकाराम सानप यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत आधार फाउंडेशनच्या वतीने त्यांना प्रतिष्ठेचा ''समाजभूषण पुरस्कार २०२६'' जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण भागात आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करणे, विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणे, गरजू रुग्णांना मदतीचा हात देणे, युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना रुजविणे आणि समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविणे यामुळे संकेत सानप यांनी अल्पावधीतच राज्यभर वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या निस्वार्थ सेवाभावी वृत्तीमुळे अनेकांना प्रेरणा मिळाली असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न विशेष कौतुकास्पद ठरले आहेत. हा पुरस्कार त्यांच्या अथक परिश्रमांची, समाजाप्रती असलेल्या समर्पणाची आणि लोकसेवेतील योगदानाची पावती मानला जात आहे. या यशाबद्दल विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून भविष्यातही त्यांच्या हातून अशीच समाजोपयोगी कार्ये घडत राहोत आणि यशाची नवनवीन शिखरे त्यांनी सर करावीत, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## 'पोकलेन'चे वाहन झाडावर धडकले

### पोकलेन पलटी झाल्यामुळे वृध्द महिला जखमी; एक म्हैस ठार



बीड । प्रतिनिधी

**पोकलेन चालविणाऱ्या चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यामुळे पोकलेन चे वाहन एका झाडाला धडकले. या विचित्र अपघातामध्ये पिकलेन घरावर जाऊन धडकले. या अपघातात एक वृद्ध महिला जखमी झाली, तर यामध्ये एक म्हैस जागीच ठार झाल्याची घटना चकलांबा पोलिस ठाण्याच्या हद्दीत शेकटा फाटा येथे घडली.**

चकलांबा येथील शेळके यांच्या मालकीचे भागेश्वर अर्थमूव्हर्स पोकलेन हे सिंगर वाडी फाटा येथून चकलांबा येथे जात असताना शेकटा फाटा पोकलेन वाहन चालवणाऱ्या चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. टर्नर सदरबान एका बाभळीच्या झाडाला धडकले आणि वाहन पलटी झाली. मोहन पल्याड नंतर सोडा, शेकटा फाटा येथील संदीप जगन्नाथ गडदे यांच्या घरावर जाऊन धडकले. वाहन झाडाला धडकल्याने मोठा अपघात टळला. मात्र पोकलेनच्या धक्क्याने एक म्हैस जागीच ठार झाली. या अपघातात गडदे यांची वृद्ध महिला जखमी झाली आहे. सदर घटना घडल्यानंतर शेकटा, तरडगव्हाण, चकलांबा आणि परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान घटनास्थळी कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी चकलांबा पोलिसांची घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल करावयाचा की, प्रकरण आपसात मिटवायचे याबाबत रात्री उशिरापर्यंत खलबते सुरू होती.

## सौताडा ग्रामपंचायत रस्त्यावरील अतिक्रमण दूर करा-ॲड.विशाल मस्के

सौताडा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा गावाचे बसस्थानका पासुन गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यांपैकी एक असलेल्या, ग्रामपंचायत ने वेळोवेळी शासकीय बजेट टाकुन सिमेंट कॉंक्रीटीकरन करून तयार केलेल्या, इंग्रज काळापासुन रहदारी असलेला दिनकर सानप यांचे घराजवळून जाणारा ग्रामपंचायत च्या मालकीचा दक्षिण उत्तर सिमेंट कॉंक्रीट च्या रोड वर गावातील दिनकर सानप व अशोक दिनकर सानप या बाप लेकाने दगडीपवळ घालून रस्ता अडवला आहे तसेच सदर रस्त्यावर खरीप टाकून रस्त्यावर पूर्णपणे अतिक्रमण करून रस्त्याच्या कडेची नाली बुजवली आहे. तसेच रस्त्याचे कडेचा दगडी बांधकामाचा कठडा देखील बुजवला आहे त्यामुळे सौताडा ग्रामस्थांना सदर रस्त्यावरून जाणे येणे पूर्णपणे बंद पडले आहे.

सदरचा रस्ता हा रहदारीचा असून सदर रस्त्याची गावकऱ्यांना अत्यंत गरज आहे सदरचा रस्ता हा नगर- बीड रोड लगत असल्याने सदर रस्त्यावर अतिक्रमण करून सदरचा रस्ता हडपण्याचा दिनकर सानप व अशोक दिनकर सानप यांचा डाव आहे. तरी सदरच्या रस्त्यावरचे अतिक्रमण तात्काळ दूर करून गावकऱ्यांना सदरचा रस्ता खुला करून दिला नाही तर सदरचा रस्ता अडवुन दुसरा जो पर्यायी पूर्व पश्चिम रस्ता अतिक्रमणधारकाने तयार केला आहे तो अत्यंत धोक्याचा असून त्यावर अपघात होऊन मनुष्यहानी होण्याची शक्यता जास्त असल्याने पूर्वीचाच सौताडा बस स्थानकापासून दक्षिण उत्तर असलेला दिनकर सानप यांचे घरासमोरून जाणारा सिमेंट कॉंक्रीटचा नाली व दगडी कठड्यासह असलेला रस्ता खुला करणे अत्यंत गरजेचे आहे. सौताडा येथील बस थांबा ते सौताडा गावात तसेच दलित वस्तीत दिनकर सानप यांचे घराजवळून जाणारा ग्रामपंचायतच्या मालकीचा दक्षिण उत्तर सिमेंट कॉंक्रीट च्या सार्वजनिक रोडवर गावातील दिनकर सानप व अशोक दिनकर सानप या बाप लेकाने दगडी पवळ घालून तसेच सदर रस्त्यावर खरीप टाकून रस्त्यावर पूर्णपणे अतिक्रमण करून रस्त्याच्या कडेची नाली व रस्त्याच्या कडेचा दगडी बांधकामाचा कठडा बुजून अडवलेल्या रस्त्याचे अतिक्रमण दूर करून सदरचा रस्ता खुला करून देण्याबाबत यापुर्वीही ग्रामस्थांनी ग्रामपंचायत सौताडा, गट विकास अधिकारी साहेब पाटोदा, तहसिलदार साहेब पाटोदा, पोलिस निरिक्षक साहेब पाटोदा, जिल्हाधिकारी साहेब बीड यांच्या कडे मागणी केली होती, परंतु ग्रामस्थांच्या मागणीला प्रशासनाने अक्षरशः डोळेझाक करून केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे ॲड. विशाल मस्के यांनी ग्रामविकास अधिकारी सौताडा यांना दिनांक २/६/२०२६ रोजी लेखी निवेदन दिले आहे सदर निवेदनावर ॲड. विशाल नवनाथ मस्के यांचे सह एकूण १३४ ग्रामस्थांच्या साह्या आहेत तरी सदर निवेदनाची दखल घेऊन ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत सौताडा सदर रस्त्यावरती अतिक्रमण काढणार आहेत की अतिक्रमण धारकाला ग्रामपंचायत सौताडा व प्रशासन पाठीशी घालून, अतिक्रमण धारकाकडुन लाच घेऊन सदरचा रस्ता हडपण्यासाठी मदत करणार आहेत, हे येत्या काही दिवसातच दिसून येईल.

## पान १ वरून...

### कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी

शकतात. दोन लाख रुपयांवरील उर्वरित कर्ज आणि व्याजाची रक्कम भरून घेताना बँका काही प्रमाणात सवलत देणार की संपूर्ण रक्कम वसूल करण्यावर ठाम राहणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे बँकांची भूमिका काय राहते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. शेतकरी संघटनांच्या मते, ज्या शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आधीच कमकुवत आहे, त्यांच्याकडून अतिरिक्त थकीत रक्कम भरण्याची अपेक्षा करणे व्यवहार्य नाही. त्यामुळे सरकारने या अटींमध्ये शिथिलता आणून अधिकाधिक शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळेल, अशी मागणी होत आहे. दरम्यान, सरकारच्या नव्या कर्जमाफी योजनेमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असला, तरी त्यातील अटी व शर्तींची अंमलबजावणी आणि बँकांची भूमिका यावरच या योजनेचे यश मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे.

-------------

### बीड जिल्ह्यातील १५ मृतांच्या

(राक्षसभुवन), ता. गेवराई. कृष्णा विष्णू पायघडे रा. भेंडगावडा, ता. गेवराई. भागवत सखाराम चव्हाण रा. इमामपूर, ता. शिरूर (कासार). नारायण अजिनाथ कव्हेडकर रा. पोखरी, ता. पाटोदा. बाळू बबन सातपुते रा. डोंगरकिन्ही, ता. पाटोदा. हरी पंडीत भिसेरा. तांदळवाडी, ता. शिरूर (कासार). सतीश ज्ञानोबा देशमुख रा. वरपगाव, ता. केज. पांडुरंग महादेव घुमरे रा. मैंदा, ता. बीड. शहादेव त्रिंबक रसाळ रा. मांजरसुबा, ता. बीड महारूद्र शिवाजी खाकरे रा. वाकनाथपूर, ता. बीड. अंकुश शंकर बावणे रा. आमला, ता. गेवराई. भरत यादव खरसाडे रा. आहेरवडगाव, ता. बीड अशोक ज्ञानोबा कादे रा. बागापिंपळगाव, ता. गेवराई यांचा समावेश आहे. सदर आर्थिक मदत संबंधित मृतांच्या कायदेशीर वारसांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया जिल्हा प्रशासनातर्फे लवकरच पूर्ण केली जाईल, अशी माहिती मिळत आहे. आरक्षणाच्या लढ्यात जीव गमावलेल्या कुटुंबांना या मदतीमुळे काहीसा आर्थिक आधार मिळणार आहे.

--------------

### मराठा आरक्षाबाबत जिल्हाधिकारी

करणाऱ्या अधिकाऱ्यांवर वेळप्रसंगी कारवाई करण्यात येईल, असा इशारा विखे-पाटील यांनी दिला आहे. न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी, शिंदे समितीच्या स्थापनेनंतर १३ लाख दाखल्यांचे वितरण; तसेच समिती स्थापन होण्याआधी कुणबी प्रमाणपत्राचे झालेले वाटप याची माहिती जिल्हा आणि तालुका स्तरावर तातडीने संकलित करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. मराठा आरक्षणाबाबतच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे ३० मे पासून कडक उन्हात बेमुदत उपोषण सुरु केले होते. त्यानंतर त्यांनी केलेल्या मागण्या मान्य केल्याचे सरकारने आश्वासन दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी मध्यरात्री उपोषण स्थगित केले होते. नोंदी सापडलेल्या मराठा समाजातील लोकांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात येईल. न्यायमूर्ती शिंदे समिताला एक वर्षाची मुदतवाढ, प्रमाणपत्र वैधतेसाठी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन, मंत्रालयात स्वतंत्र हेल्पलाईन, मराठा आरक्षण कक्ष स्थापन करणे आदी जरागेंनी केलेल्या प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या. तसेच त्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

-------------

### देशात आणीबाणी लागणार;मोदी

केला की, काही महत्त्वाच्या संस्थांमधून त्यांना मेसेज येत आहेत. निवडणूक आयोग, गुप्तचर यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेतील काही व्यक्तींकडून असंतोष व्यक्त केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. त्यांच्या मते, पूर्वी पूर्णपणे नियंत्रणात असलेल्या संस्था आता स्वतंत्रपणे विचार करू लागल्या असून सत्तेच्या विरोधात आवाज उठवत आहे. राहुल गांधी यांनी पुढे दावा केला की, लोकांमधील वाढता असंतोष दडपण्यासाठी सरकार कठोर पावले उचलू शकते. त्यांनी देशात आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यताही व्यक्त केली. त्यांच्या मते, जनतेचा दबाव वाढल्यास सत्ताधारी पक्ष परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करू शकतो. राहुल गांधी यांच्या या वक्तव्यामुळे देशातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. पंतप्रधान मोदी वर्षभरात पदावर राहणार नाहीत, आर्थिक संकट येणार आहे आणि आणीबाणी लागू शकते, या दाव्यांमुळे आता सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये नवा राजकीय वाद रंगण्याची चिन्हे दिसत आहेत. मात्र, राहुल गांधी यांनी केलेले हे दावे त्यांच्या वैयक्तिक राजकीय आकलनावर आधारित असून त्यासंदर्भात कोणतेही अधिकृत पुरावे त्यांनी सार्वजनिकपणे सादर केलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विधानांवर आता सत्ताधारी पक्षाकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------

### कर्जमुक्तीच्या अटी दिलासासाठी की,

शेतकऱ्यांना महाविकास आघाडी सरकारच्या २०१९ च्या कर्जमाफीचाही लाभ मिळाला होता. मग आता नवीन अटी लावून शेतकऱ्यांना लाभापासून वंचित का ठेवले जात आहे? शेतकरी आधीच संकटात आहे. त्याला आधार देण्याऐवजी जाचक अटींच्या विळख्यात अडकवणे हा अन्याय आहे. कर्जमाफी द्यायची असेल तर ती सरसकट, पारदर्शक आणि विनाअट द्यावी. महायुतीने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा ,या अटीं आणि निकषांच्या आडून शेतकऱ्यांची पिळवणूक करू नका! आपला शब्द पाळा.. असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

---------

### आघाडीच्या बैठकीकडे

डीएमकेने जारी केलेल्या अधिकृत पत्रकात म्हटले आहे की, तमिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर कॉंग्रेस पक्षाने डीएमकेसोबत केलेल्या विश्वासघातामुळे डीएमके कार्यकर्ते अद्यापही अत्यंत दुखावलेले आहेत.

-------------

### मॉन्सून २ दिवसांत

रविवारी सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यात तर मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, सांगली अहिल्यानगर जिल्ह्यात वादळी पावसाचा अंदाज आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. मराठवाड्यात ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सोमवारी सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी तर मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि अहिल्यानगर जिल्ह्यात वादळी पावसाचा अंदाज आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विदर्भातील नागपूर, भंडारा आणि गोंदीया जिल्ह्यात वादळी पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. ०५ जून २०२६



## थोडक्यात

### बीडच्या 'सुरेश और रमेश की इस्टोरी'ला १९ आंतरराष्ट्रीय पुरस्कार

गेवराई । प्रतिनिधी




बीड जिल्ह्यातील मधुकर चित्र प्रस्तुत 'सुरेश और रमेश की इस्टोरी' या मराठी-हिंदी विनोदी लघुपटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे यश मिळवत आतापर्यंत १९ पुरस्कारांवर नाव कोरले आहे. इंटरनॅशनल आयकॉनिक शॉर्ट सिने अवॉड्र्समध्ये १२ तर इंडो-जपान आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्ये ७ पुरस्कार पटकावत या लघुपटाने बीड जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे.

निर्माते मधुकर म्हस्के व श्रीवास नायडू, दिग्दर्शक श्रीवास नायडू आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर अनिरुद्ध म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली हा लघुपट साकारला आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे चित्रित झालेल्या या चित्रपटात श्रीवास नायडू यांनी एकाच वेळी चार भूमिका साकारल्या आहेत. ग्रामीण जीवनावर आधारित या लघुपटाला देश-विदेशातील प्रेक्षक आणि परीक्षकांकडून मोठी दाद मिळत असून, आगामी आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये आणखी पुरस्कार मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### इंटरनॅशनल अबॅकस ऑलिम्पियाडमध्ये मडकेजी चॅम्प क्लासेसचा बोलबाला

गेवराई : शिक्षणाच्या क्षेत्रात सतत उत्कृष्टतेचा नवा मापदंड निर्माण करणाऱ्या मडके जी चॅम्प अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा



इंटरनॅशनल स्तरावर आपली ताकद सिद्ध केली आहे. हैदराबाद येथे पार पडलेल्या इंटरनॅशनल अबॅकस ऑलिम्पियाड परीक्षेत या क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी झंझावाती कामगिरी करत यशाची परंपरा कायम राखली.

दिनांक ३१ जून २०२६ रोजी हैदराबाद येथील विद्यापीठात झालेल्या या स्पर्धेत ऑनलाईन गटामध्ये शरण्या पवार हिने सुपरस्टार मानांकन मिळवत सर्वांचे लक्ष वेधले. पृथ्वीराज येवले, उत्तरा येवले आणि स्वराज पंडित यांनी फर्स्ट रँक मिळवत क्लासेसचा झेंडा उंचावला. श्रीशा पिसाळ व यश जाजू यांनी सेकंड रँक, तर गीतिका मंगरमानी, आर्यन लेंडाळ, अस्मिता लेंडाळ, आरव पवार, कार्तिक साखरे, मानसी जाजू व जानवी मोटे यांनी थर्ड रँक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. सोहम जावळे याने षळीीं ीरपज्ञ मिळवून आपली छाप पाडली.

ऑफलाईन गटामध्येही मडके जी चॅम्प क्लासेसचा दबदबा कायम राहिला. उत्तरा येवले हिने सुपरस्टार मानांकन, स्वराज पंडित (फर्स्ट रँक), वेदिका खेडकर (थर्ड रँक), आर्यन लेंडाळ व अस्मिता लेंडाळ यांनीही उत्कृष्ट कामगिरी करत यशाची परंपरा पुढे नेलीयशामागे आहे योग्य मार्गदर्शन आणि अभ्यासाची शिस्त

या सर्व यशामागे क्लासेसच्या संपादिका प्रा. सौ. सरिता उद्धव मडके यांचे कुशल मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली समर्पित वृत्ती कारणीभूत ठरली आहे. त्यांच्या उत्कृष्ट अध्यापनाची दखल घेत त्यांना बेस्ट टीचर अवॉर्ड आणि इंटरनॅशनल अबॅकस ऑलिम्पियाड टीचर अवॉर्ड प्रदान करण्यात आला आहे.

=ड्ड पालकांचा वाढता विश्वास - उज्ज्वल भविष्याची खात्री

मडके जी चॅम्प अबॅकस क्लासेस हे केवळ गणित शिकवणारे केंद्र नसून मुलांच्या बुद्धिमत्तेचा, एकाग्रतेचा आणि आत्मविश्वासाचा सर्वांगीण विकास करणारे एक सक्षम व्यासपीठ ठरत आहे. या सातत्यपूर्ण यशामुळे पालकांचा विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत असून, क्लासेसमध्ये प्रवेशासाठी उत्सुकता मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

गेवराई तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात मडके जी चॅम्प अबॅकस क्लासेसने निर्माण केलेला हा यशाचा नवा इतिहास निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# महसूल प्रशासनाचा भोंगळ कारभार उघड शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिक हैराण

आष्टी । प्रतिनिधी

डिजिटल सातबारा, ऑनलाइन फेरफार, पारदर्शक प्रशासन आणि सुशासनाच्या मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या महसूल विभागाचा खरा चेहरा आष्टी तालुक्यात उघड झाला आहे. नागरिकांच्या सोयीसाठी असलेली तलाठी कार्यालये आता सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी ठरत असून, कार्यालये बंद, तलाठी गायब आणि खासगी एजंटांच्या माध्यमातून सुरू असलेली कथित वसुली यामुळे ग्रामीण भागातील नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत.

आष्टी तालुक्यातील चोभानिमगाव सजाच्या कार्यालयाची पाहणी केली असता धक्कादायक वास्तव समोर आले. आष्टी शहरातील एका अरुंद बोळातील खासगी इमारतीत हे कार्यालय हलविण्यात आले असले तरी बाहेर कुठेही शासकीय कार्यालयाचा बोर्ड किंवा अधिकृत नामफलक नव्हता. नागरिकांना चौकशी केल्यानंतरच हे तलाठी कार्यालय असल्याचे समजत होते.

बुधवारी दुपारी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान कार्यालयाच्या मुख्य दरवाजाला कुलूप लटकलेले होते. बाहेर कडक उन्हात चोभानिमगाव परिसरातील वृद्ध शेतकरी कामासाठी ताटकळत उभे होते. तलाठ्याशी संपर्क साधल्यावर मी महत्त्वाच्या शासकीय बैठकीसाठी बाहेर आहे, असे उत्तर देण्यात आले. मात्र प्रत्यक्षात कार्यालय बंद असल्याने नागरिकांच्या संतापात भर पडली.

**रिक्त पदांचा फटका; एका तलाठ्याकडे तीन ते चार सज्जांचा भार**

आष्टी तालुक्यात अनेक तलाठी पदे रिक्त असून, निवृत्ती व बदल्यांमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. अनेक तलाठ्यांकडे तीन ते चार सजांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. त्यामुळे गावांमध्ये आठवड्यातून एकदाही तलाठी उपलब्ध नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.याचा सर्वाधिक फटका शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना बसत आहे. सातबारा, फेरफार, वारस नोंद, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, जात प्रमाणपत्र अशा अत्यावश्यक कामांसाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत.

**७ किलोमीटरऐवजी १५ किलोमीटरचा हेलपाटा**

चोभानिमगावचे तलाठी कार्यालय पूर्वी कडा येथे कार्यरत होते. कडा हे गाव चोभानिमगावपासून अवघ्या ७ किलोमीटर अंतरावर असताना हे कार्यालय अचानक आष्टी येथे हलविण्यात आले. परिणामी नागरिकांना आता तब्बल १५ किलोमीटरचा अतिरिक्त प्रवास करावा लागत आहे. याबाबत बोलताना शेतकरी कोंडिबा रेपाटे म्हणाले, कडा येथे काही रेकॉर्ड तर आष्टी येथे काही रेकॉर्ड ठेवण्यात आले आहेत. एक ठिकाणी काम झाले नाही तर दुसऱ्या ठिकाणी जावे लागते. त्यात खासगी व्यक्तीमार्फत काम होत असल्याने आठ-आठ दिवस चकरा माराव्या लागतात.

**'पंटर संस्कृती' फोफावल्याचा आरोप**

या पाहणीत आणखी एक गंभीर बाब समोर आली. कडा येथील जुन्या कार्यालयात महसूल विभागाचे काही दप्तर ठेवून त्याचा ताबा कथितरित्या खासगी एजंटाकडे देण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तलाठी अनुपस्थित असताना हाच एजंट नागरिकांना साहेब दुसऱ्या कार्यालयात गेले आहेत असे सांगून वेळकाढूपणा करतो आणि काम करून देण्याच्या नावाखाली पैशांची मागणी केल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

महसूल प्रशासनाने या प्रकाराची तातडीने चौकशी करण्याची मागणी होत आहे.

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती**

सध्या शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. रहिवासी, उत्पन्न व जातीचे दाखले मिळण्यात विलंब होत असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश आणि शिष्यवृत्तीची कामे अडकली आहेत. दुसरीकडे वारस नोंद, फेरफार आणि जमीन व्यवहारांचे प्रस्ताव प्रलंबित पडले आहेत.

ऑनलाइन यंत्रणा बंद पडली तर काम ठप्प, आणि ऑफलाइनसाठी तलाठी उपलब्ध नाहीत, अशा दुहेरी संकटात नागरिक सापडले आहेत.

अवैध वाळू उपशालाही खतपाणी?

गावांमध्ये महसूल कर्मचाऱ्यांची उपस्थिती कमी झाल्याने नदीपात्रातील अवैध वाळू उपसा आणि इतर बेकायदेशीर प्रकारांवर नियंत्रण राहिले नसल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे. महसूल यंत्रणा गावांमध्ये नियमित फिरकत नसल्याने गैरप्रकारांना अप्रत्यक्षपणे चालना मिळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांच्या प्रमुख मागण्या

बंद असलेली तलाठी कार्यालये तातडीने मूळ ठिकाणी सुरू करावीत, खासगी एजंट व पंटरांच्या माध्यमातून होणारी कथित आर्थिक लूट थांबवावी, प्रत्येक तलाठ्याने मुख्यालयाच्या ठिकाणी राहणे बंधनकारक करावे, आठवड्यातून किमान दोन दिवस गावात चावडीवर बसून नागरिकांची कामे करावीत, रिक्त तलाठी पदे तातडीने भरावीत, महसूल कार्यालयांमध्ये उपस्थितीची पारदर्शक व्यवस्था सुरू करावी

जिल्हा प्रशासनाची भूमिका काय?

महसूल विभाग हा ग्रामीण प्रशासनाचा कणा मानला जातो. मात्र कार्यालये बंद, तलाठी अनुपस्थित आणि नागरिकांची होणारी गैरसोय यामुळे प्रशासनाविषयीचा विश्वास डळमळीत होत आहे. आष्टीचे तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सर्वसामान्य शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांना वेळेवर सेवा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अन्यथा डिजिटल प्रशासनाच्या घोषणा केवळ कागदावरच राहतील आणि ग्रामीण भागातील नागरिकांची फरफट अशीच सुरू राहील.

## शेतरस्त्यावर अतिक्रमण; तहसीलदारांनी दिले चौकशी व कारवाईचे आदेश

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

मलकापूर येथील गट क्रमांक ३३२/१ मधील शेतात जाणाऱ्या रस्त्यावर झालेल्या कथित अतिक्रमणाबाबत तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, परळी वैजनाथ यांनी संबंधित यंत्रणेला चौकशी करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच या प्रकरणात मंडळ अधिकारी, तलाठी, गावचे पोलिस पाटील यांना लांब ठेवावे, तसेच पोलिस पाटील हे स्वतः मनमानी करत आहेत. ते प्रशासणाची दिशाभूल करत आहेत. त्यामुळे या सर्व महसूल प्रशासनातील स्थानिक अधिकाऱ्यांवर विश्वास नसल्यामुळे निष्पक्ष चौकशीसाठी बाहेरील तालुक्यातील महसूल प्रशासनातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी अशी मागणी कोंडीबा माणिक आंधळे यांनी केली आहे.

हेळंब येथील रहिवासी कोंडीबा माणिक आंधळे व इतरांनी तहसीलदारांकडे दिलेल्या निवेदनात परळी वैजनाथ तालुक्यातील मलकापूर येथील त्यांच्या शेतात जाणाऱ्या रस्त्यावर मलकापूर गावातील व्यक्तींनी गायरान जागेत गोठा बांधून रस्ता अडविल्याची तक्रार केली होती. यामुळे शेतातील कामकाज करण्यास मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले होते. या तक्रारीची दखल घेत तहसीलदार कार्यालयाने ३ जून २०२६ रोजी मंडळ अधिकारी परळी व तलाठी सज्जा परळी वैजनाथ ग्रामीण यांना पत्र देत सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच शासन निर्णयानुसार संबंधित शेतरस्त्यावरील अतिक्रमण काढण्याबाबत आवश्यक कार्यवाही करून त्याचा अहवाल तहसील कार्यालयास सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.तहसील प्रशासनाच्या या आदेशामुळे संबंधित प्रकरणातील चौकशीला वेग मिळणार असून शेतरस्त्यावरील अतिक्रमणाचा प्रश्न लवकरच निकाली लागणार आहे.असून संबंधित अतिक्रमणाविरुद्ध लवकरच कारवाई होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. याबाबत जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी परळी तसेच पोलीस निरीक्षक, परळी ग्रामीण यांनाही माहिती देण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या शेतात जाण्याचा मार्ग खुला राहावा आणि कोणालाही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी अर्जदार कोंडीबा माणिक आंधळे व इतरांनी केली आहे.

## पान ६ वरुन...

### हुंड्यासाठी विवाहितेची

करण्यात आला आहे. मूळची परभणी येथील रहिवासी असलेल्या पूजाचे वर्षभरापूर्वीच प्रमोद सुरवसे याच्याशी लग्न झाले होते. सुरुवातीचे काही दिवस सर्व काही आनंदाने सुरू होते. परंतु सासरच्या मंडळींकडून वारंवार त्रास दिला जात असल्याचं पूजाने आपल्या कुटुंबीयांना सांगितले होते. दरम्यान, या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. तपासानंतर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती गेवराई पोलिसांनी दिली.

### मंत्री पंकजाताईंनी दिलेला

बुधवार दि.३ जून २०२६ रोजी दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना अभिवादन करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राज्याच्या पशू संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष दिवंगत हाजी एजाज देशमुख यांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपये मदतीचा धनादेश सुपुर्द केला. दिवंगत हाजी एजाज देशमुख यांच्या पत्नीच्या नावे असलेला धनादेश त्यांच्या मुलाच्या हाती देत पंकजाताईंनी कुटुंब प्रमुखाप्रमाणे देशमुख कुटुंबीयांची ख्याली खुशाली विचारत आईची काळजी घे असा मायेचा सल्ला हाजी एजाज देशमुख यांच्या मुलाला दिला. हाजी एजाज देशमुख हे मुंडे साहेबांचे अत्यंत लाडके कार्यकर्ते होते. अल्पसंख्यांक आघाडीच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या वाढीसाठी त्यांनी अविस्मरणीय योगदान दिलेले आहे याची जाणीव ठेवत पंकजाताई मुंडे यांनी गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून ही मदत देशमुख कुटुंबीयांना दिली. बीड येथे भाजप प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांच्या पुढाकारातून झालेल्या शोकसभेत पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी देशमुख कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. ताईंनी दिलेला शब्द आज गोपीनाथ गडावरून मुंडे साहेबांच्या पुण्यतिथी दिनी पूर्ण केला. यावेळी भाजप नेत्या डॉ. प्रितमताई मुंडे, आ. नमिताताई मुंदडा वयांच्यासह भाजपचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर,इर्शाद देशमुख, जिल्हाध्यक्ष इर्शादभाई शेख, शेख फारुक, नूरलाला खान,जिया शेख,अमेर काज़ी,आमू सय्यद आदींची उपस्थिती होती.

### परळीतील 'त्या' मृत्यूचे गूढ

देणे-घेण्याच्या वादातून आम्हीच अफजलखान याचा दगडाने मारून खून केला आणि पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह लेंडेवाडी शिवारातील रेल्वे रुळावर फेकून दिला, अशी कबुली आरोपींनी दिली. पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी परळी ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास परळी ग्रामीण पोलीस करत आहेत.

यांनी केली कामगिरी:

सदरची धडक कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि सुशांत सुतळे, पोलीस अंमलदार आनंद मस्के, रामचंद्र केकान, सचिन सानप, गोविंद भताने, सचिन आंधळे आणि नितीन वडमारे यांच्या पथकाने केली आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या

करण्यात आले आहे.यावेळी तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे सह वरिष्ठ उपाध्यक्ष महावीर मस्के, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी, अशोक कांबळे, अहेमद शेख, किसन लोखंडे, विठ्ठल कांबळे,कल्याण भारस्कर,जाणूशाह शेख,करामा अनसारी, पप्पू कसबे, फारुख शेख, आदित्य कांबळे, धुराजी कांबळे, दिगांबर कांबळे आदी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परळीतील तोहीद खान

त्यांनी नमूद केले.निवेदन देताना ड. नारायण गोले पाटील, ड. नासेर खान, नगरसेवक सय्यद लतीफ, शेख शौकत, इरफान मिर्झा, ड. डोंगरे, बाबा काझी, नवीद सिद्दीकी, ड. भास्कर उजगरे, गोरख टाकणखार, शेख सत्तार टेलर, जय राम राऊत, सुनील शेवाळे, गुलाब शेख, शेख इकरार, जावेद पटेल, सलमान खान यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या घटनेबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप असून दोषींना कठोर शिक्षा होईपर्यंत न्यायासाठीचा लढा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### जनगणनेच्या राष्ट्रीय

व पाय फ्रॅक्चर झाला आहे त्यांची आर्थिक परिस्थिती खूप नाजूक असल्यामुळे त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता आहे तरी शासनामार्फत त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी मुख्य अधिकारी तथा जनगणना चार्ज अधिकारी नगरपंचायत वडवणी तसेच तहसीलदार वडवणी यांच्याकडे वडवणी येथील जनगणनेचे काम पाहणारे सुपरवायझर उपप्राचार्य श्री.घायतीडक सर,सुपरवायझर श्री. सुनीलजी कुलकर्णी सरतसेच त्यांचे प्रगणक प्रा.मुंडे सी.व्ही.सर,इतापुरे सर,कुरकुटे सर सर,शिंदे सर,प्रा.डाके सर,चव्हाण सर,उजगरे सर, साळवे सर यांच्यासह त्यांच्यासोबत काम करणारे प्रगणकांनी लेखी निवेदन देऊन वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत तातडीने करावी अशी विनंती केली आहे.

## जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेत अतिक्रमण; कनिष्ठ अभियंत्याची बोटचेपी भूमिका

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्हा परिषदेच्या बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात असलेल्या जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेत अनधिकृत अतिक्रमण करण्यात आले आहे. या शाळेतील अतिक्रमणाला जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याच्या छुप्या पाठिंब्यामुळे सदर अतिक्रमण काढण्यात येत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

यासंदर्भात माहिती अशी बीड जिल्हा परिषदेच्या कन्या माध्यमिक शाळेत गेल्या दिवसापासून अतिक्रमण करण्यात आले आहे. कन्या शाळेच्या परिसरात बीड जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग, माध्यमिक शिक्षणाधिकारी, निरंतर शिक्षणाधिणारी, या कार्यालयासह जिल्हा परिषदेची मुलींची माध्यमिक शाळा आहे. सध्या जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेच्या संरक्षण भिंतीचे काम सुरू आहे. अतिक्रमण न काढता काम सुरू असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान सदर अतिक्रमण काढण्यासाठी पोलिसांना पत्र देण्यात आले. मात्र अद्यापपर्यंत अतिक्रण न काढल्याने अधिकाऱ्याच्या भूमिकेविषयी संशय व्यक्त होत आहे.

## ईट येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर च्या वतीने आयोजित मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबीर ईट येथील रेवणनाथ मंदिरात संपन्न झाले.

या शिबीराची सुरुवात दीपप्रज्वलन, श्री स्वामी समर्थ महाराज, धन्वंतरी चे पूजन करून झाले. यावेळी सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर चे डॉ मोहनराव गौरकर, डॉ नानासाहेब शेवाळे, ईट ग्रामपंचायत चे सरपंच संजय असलकर, उपसरपंच सौ प्रज्ञा देशपांडे, ग्रामपंचायत सदस्य सयाजी हुंबे, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ सुनिता वाघवकर, आरोग्य दुत जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे, संतोष दिक्षीत ग्रामस्थ, महिला-पुरुष उपस्थित होते. यावेळी उपसरपंच सौ प्रज्ञा देशपांडे, ग्रामपंचायत सदस्य सयाजी हुंबे यांनी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या सामाजिक, अध्यात्मिक उपक्रम या विषयी मनोगत व्यक्त केले. सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर व आरोग्य विषयक डॉ मोहनराव गौरकर यांनी मार्गदर्शन केले. शिबीराचे प्रास्ताविक शिवशंकर भंडारे यांनी केले. या शिबीरात विविध आजारांची मोफत तपासणी करण्यात आली.



**सद्गुरू प.पू.मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल त्र्यंबकेश्वरचा उपक्रम**

## शेतकऱ्यांनी खरीप पेरणीपूर्वी बियाण्यांवर बीजप्रक्रिया करावी -कृषी अधिकारी साळवे

बीड । प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त झाला असून, पेरणीची लगबग सुरू झाली आहे. विविध कीड-रोगांच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बीजप्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे यावर्षी खरीप पेरणी करताना शेतकऱ्यांनी बियाण्यांची थेट पेरणी न करता, बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी, असे आवाहन बीडचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

बियाणांच्या माध्यमातून किंवा जमिनीतून होणारा कीड-रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापनात बीजप्रक्रिया हा अत्यंत महत्त्वाचा आणि प्रभावी मार्ग असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. बियाण्यांना पेरणीपूर्वी औषध किंवा जैविक खतांची प्रक्रिया केल्यास पिकांचे सुरुवातीच्या काळात मोठे संरक्षण होते. पिकनिहाय बियाण्याच्या वजनानुसार बुरशीनाशक, कीटकनाशक आणि जिवाणू खतांचे प्रमाण ठरलेले असते. याबाबतच्या अधिक माहितीसाठी व शिफारसींसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या भागातील सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहनही कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

बीजप्रक्रिया करण्याचे फायदे - बियाणांपासून प्रसारित होणाऱ्या आणि जमिनीत असणाऱ्या बुरशीजन्य रोगापासून संरक्षण मिळते. जमिनीत असणाऱ्या किडींचा तसेच पेरणी पासून ३०-३५ दिवस रस शोषक किडी आणि खोड माशी यांचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होते. कीड व रोग व्यवस्थापनेच्या खर्चात बचत होते. बियाण्याची उगवण क्षमता वाढवते. जैविक खताच्या प्रक्रियेमुळे जिवाणू झाडांना, पिकांना अन्नद्रव्य लवकर उपलब्ध करून देतात, त्यामुळे झांडाची, पिकांची वाढ जोमाने होते.

बीजप्रक्रिया करतेवेळी घ्यावयाची काळजी - बीजप्रक्रिया करण्यासाठी हातमोजे, मारक, चष्मा या सारख्या व इतर संरक्षण करणाऱ्या बाबीचा वापर करावा. बीजप्रक्रिया तळवटावर किंवा बारदाण्यार किंवा सीड ड्रम, यंत्राद्वारे सावलीत करावी. बियाणे हाताने चोळू नये, कापडाने किंवा पिशवीमध्ये एकत्र मिसळून घ्यावे. रासायनिक आणि जैविक बीजप्रक्रिया एकत्र करू नयेत. विकत घेतलेल्या बियाण्यांवर बुरशीनाशक आणि कीटकनाशकांची बीजप्रक्रिया केली असल्यास अशा बियाण्यांवर फक्त जिवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी. बीजप्रक्रियेचा क्रम असा असावा, प्रथम रासायनिक बुरशीनाशक, त्यानंतर रासायनिक कीटकनाशक व त्यानंतर ३ ते ४ तासांनी जैविक बुरशीनाशक व जैविक कीटकनाशके त्यानंतर ३ ते ४ तासांनी रायझोबिअम किया ॲझोटोबॅक्टर (जिवाणू संवर्धक) सर्वात शेवटी केएमबी किवा पीएसबी (जिवाणू संवर्धक) यांची बीजप्रक्रिया करावी. नैसर्गिक शेतीचा अवलंब करत असताना फक्त बीजामृताचीच बीजप्रक्रिया करावयाची आहे. नैसर्गिक शेती करताना रासायनिक बुरशीनाशक, रा. कीटकनाशक व जैविक बुरशीनाशक व जै. किटकनाशके व जिवाणू संवर्धक यांची बीजप्रक्रिया करु नये. असेही कळविले आहे.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२८९ दिनांक-०४/०५/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती दिपाली संदीप दळवी रा.अंबड हल्ली मुक्काम (श्रीरामपुर ता.श्रीरामपुर जि.अहमदनगर) ता.अंबड जि.जालना यांनी त्यांच्या मुलीच्या नामे दिव्या संदीप दळवी रा.अंबड हल्ली मुक्काम (श्रीरामपुर ता.श्रीरामपुर जि.अहमदनगर) हिचा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | दिव्या संदीप दळवी | मुलगी | १०/११/२०१७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# मृदा, जल आणि वृक्ष संवर्धन केले तरच भविष्य उज्ज्वल-गांधी

## सरस्वती नदी पुनरुज्जीवन कामाचा शुभारंभ; हजारोंच्या उपस्थित संवाद मेळावा संपन्न



परळी : मौजे दिंद्रुड येथे सरस्वती नदीच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाचा शुभारंभ जलनायक मयंक गांधी, टाटा ट्रस्टचे रवींद्रजीत सिंह व राकेश सिंह, आनंद बारिया, रिमी ओबेरॉय, देवदत्त सिंह, देव रंजन यांच्या उपस्थितीत झाला. ग्लोबल विकास ट्रस्ट आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पांतर्गत सरस्वती नदीच्या सुमारे ५ किमी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येणार असून ३५ रिचार्ज शाफ्ट उभारले जाणार आहेत. यामुळे जलसाठा वाढून भूजल पुनर्भरणास मोठी चालना मिळणार आहे.

तद्नंतर झालेल्या नागरिक संवाद मेळाव्यात जलनायक मयंक गांधी यांनी जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि शाश्वत शेतीचे महत्त्व विशद केले. ''पाणी उपलब्ध झाले तर शेतीसह ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळते. त्यामुळे जलसंधारणासोबत पाण्याचा नियोजनबद्ध वापरही आवश्यक आहे,'' असे ते म्हणाले. त्यांनी शेतकऱ्यांना फळबाग लागवड, सूक्ष्म सिंचन आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. यावेळी २३ ते २९ जुलै २०२६ दरम्यान गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने राबविण्यात येणाऱ्या २५ लाख वृक्ष लागवड व संवर्धन महाअभियानाची माहिती देण्यात आली. पर्यावरण संतुलनासाठी जलसंधारण आणि वृक्षसंवर्धन एकमेकांना पूरक असल्याचा संदेश देत ग्रामस्थांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. ग्रामस्थांनी लोकसहभागातून जमा केलेली लोकवर्गणी यावेळी मयंक गांधी यांच्याकडे सुपूर्द केली. कार्यक्रमास शेतकरी, महिला, ग्रामस्थ आणि विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रवींद्रजीत सिंह (टाटा ट्रस्ट) यांनी सांगितले की, ''गावांचा एकोपा आणि ग्लोबल विकास ट्रस्टचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. ही चळवळ अधिक व्यापक व्हावी आणि देशाचा विकास व्हावा यासाठी टाटा ट्रस्ट नेहमी सहकार्य करेल.'' दुष्काळाकडून समृद्धीकडे चाललेला प्रवास खरोखरच कौतुकास्पद असून, ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाची व्याप्ती देशभर व्हावी असा मानस त्यांनी व्यक्त केला. पांडुरंग वाकसे (शेतकरी) म्हणाले की, ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आम्हाला भरपूर मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाली. वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळे आम्ही फळबाग लागवडीतून एकरी लाखांचे उत्पन्न घेत आहोत.

पाण्याचा कायम दुष्काळ असलेल्या आमच्या गावातील सरस्वती नदीचे पुनरुज्जीवन होत असल्यामुळे आता आमच्या शेतीसाठी मुबलक पाणी मिळेल अशी आशा आहे. ''शाश्वत पाण्यासाठी गावातील सर्व समाजघटक एकत्र आले आहेत. या उपक्रमाने केवळ पाणीच नाही, तर मनेही जोडली आहेत.''

# बोंडअळी रोखण्यासाठी सरकारची रणनीती

## कापूस बियाणे विक्रीवर नियंत्रण, धोका टाळण्यासाठी शासनाचे कडक पाऊल

मुंबई / प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२६ साठी राज्य शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. कापसावरील गुलाबी बोंडअळीचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी यंदा कापूस बियाण्यांची विक्री आणि लागवडीचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य विभागाने जारी केलेल्या पत्राद्वारे या सूचना स्पष्ट केल्या आहेत. मागील काही वर्षांत गुलाबी बोंडअळीमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामुळे यंदा सुरुवातीपासूनच लागवड नियोजनबद्ध पद्धतीने करण्यावर शासनाने भर दिला आहे. बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये तसेच जादा दराने विक्री होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क राहणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. जिल्हा आणि तालुका स्तरावर विशेष देखरेख ठेवून बियाण्यांचा पुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी घाईघाईने लागवड करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. शासनाच्या सूचनेनुसार १ जूननंतरच कापूस लागवड करावी. तसेच किमान १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच पेरणी करणे योग्य राहील, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे. वेळेपूर्वी लागवड केल्यास गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका अधिक असल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे. त्यामुळे हवामान, पावसाची स्थिती आणि कीड व्यवस्थापन लक्षात घेऊनच लागवडीचा निर्णय घ्यावा, असेही सांगण्यात आले आहे.

गेल्या काही हंगामांत विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना गुलाबी बोंडअळीमुळे मोठा आर्थिक फटका बसला होता. उत्पादनात घट, वाढलेला फवारणी खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे शेतकरी अडचणीत आले होते. या पार्श्वभूमीवर यंदा शासनाने हंगामाच्या सुरुवातीपासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला आहे.



# नवीन फळबाग लागवडीचे नियोजन/पूर्व तयारी

राज्यामध्ये सन १९९०-९१ पासून रोजगार हमी अंतर्गत १०० टक्के अनुदानित फळझाड लागवड हि महत्त्वाकांक्षी योजना सुरु झाली.तेंव्हा पासून फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील शेतकऱ्यांच्या मनावर रुजली. फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील पडीक जमिनीला मिळालेले वरदान ठरल,अस म्हटल तर वावग ठरू नये. फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी ''फळबाग लागवडीची पूर्वतयारी आणि नियोजन'' या महत्वाच्या बाबी आहेत.

फळबागेच्या यशस्वी लागवडीकरिता महत्वाच्या बाबी :आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे? आपल्या जमिनीत फळझाडे येतील का?बारमाहीपाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का?आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय?बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील? जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय? प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते. फळबाग म्हणजे ५ ते ६ महिन्याच्या पिकांच्या मशागतीची गोष्ट नसते, तो एक दिर्घकाळ चालणारा व्यवसायाच म्हणायला हरकत नाही. एकदा त्यात पडले कि थांबुन चालत नाही. अनेक वर्ष सात्यत्याने व चिकाटीने बागेचे फलोत्पादन हाती येईपर्यंत कष्ट करावे लागतात. मेहनत घ्यावी लागते.घामही गाळावा लागतो. कधी कधी पैसा अपुरा पडतो,पाणी पुरत नाही.भावनेच्या भरात एखादी बाग करावयाची ठरविले जाते आणि मग धाडस निभाविता येत नाही.सगळा पसारा अर्ध्यावर सोडावा लागतो.त्यामुळे केलेल्या कष्टाची पैशाची, अनाठायी नासाडी होते.त्यामुळे फळबाग लागवड करण्यापूर्वी योग्य नियोजनाची नितांत आवश्यकता असते.



फळबागेसाठी जमिनीची निवड :आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम कि भारी हे सर्वांना परिचित असतेच.जर माहिती नसेल तर माहिती करून घ्यावी.जमिनीची खोली किती आहे? जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी.फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत,मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा.मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे,त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे.

माती परिक्षण नमुना :फळबागे करिता मातीचा नमुना घेताना जमिनीच्या प्रकारानुसार प्रातिनिधिक नमुना घ्यावा. सर्वप्रथम ३ ३ ३ फुट खोलीचा (१०० से.मी) किंवा मुरूम लागेपर्यंत खड्डा करून पृष्ठभागापासून प्रत्येक फुटातील प्रतिनिधिक नमुना काढावा व तो वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये भरून तपासणी साठी पाठवावा.माती परीक्षणाप्रमाणेच पाण्याची तपासणी करणे आवश्यक आहे.आपले विहिरीचे/ बोअर चे पाणी क्षारयुक्त वा मचूळ असू नये ते गोड असावे. तेव्हा माती बरोबरच,पाण्याचेही रासायनिक परिक्षण करून घ्यावे आणि त्या अनुषंगानेच फळझाडांची निवड करावी.

फळबागेसाठी पाण्याची उपलब्धता :बागायती फळझाडांना नियमित पाणी द्यावे लागते, अशा बागायती फळझाडांची लागवड करताना कितपत पाणीपुरवठा पुरेल किंवा पाण्याची उपलब्धता किती आहे,याचा विचार करूनच नियोजन करावे.कोरडवाहू फळपिकांना लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्ष पाण्याची,चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते.नारळ, सुपारी, केळी, पपई,चिकू मसाला पिके यांना इतर फळझाडांपेक्षा जास्त पाणी लागते.तसेच फळझाडांवरील कीड व रोगांच्या नियंत्रणाकरिता आवश्यक फवारणीसाठी पाण्याची आवश्यकता असते.म्हणून पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळझाडांची निवड करावी. आपल्याकडे १२ महिने पाण्याची सोय असेल तर ज्या फळझाडांना बाराही महिने पाणी लागते अशा फळझाडांची निवड करावी.आपल्याला पाणी आठ महिने पुरत असेल तर पेरू सारखी फळझाडे लावावीत.आपले पाणी फक्त सहा महिने पुरत असेल तर सीताफळ, रामफळ, आवळा, बोर या सारखी कोरडवाहू फळझाडांची लागवड करावी.

हवामानानुसार फळपिकांची लागवड :महाराष्ट्रातील शेतकरी या बाबतीत खरोखरच भाग्यवान आहेत, कारण आपल्या राज्यात सफरचंद वगळता बहुतेक फळझाडांची यशस्वी लागवड करता येते. कारण आपल्या राज्यातील हवामान फळबाग लागवडीसाठी खुपचअनुकूल आहे.यामुळे हवामांनाच्या बाबतीत फळबाग लागवड करताना शेतकऱ्यांना फारसा विचार करावा लागत नाही.आपल्या राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घ्यावीत.पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू,पेरू,द्राक्षे,डाळिंब यासारखी फळझाडे घ्यावीत.कोकणसारख्या अति पावसाच्या भागात चिकू, नारळ, फणस, आंबा काजू यासारखी फळझाडे घ्यावीत.अति कमी पावसाच्या भागात बोर, सीताफळ, आवळा, चिंच अशी कोरडवाहू फळझाडे घ्यावी.

फळबागेची आखणी आणि अंतर :फळझाडांची आणि जागेची निवड झाल्यावर लागवडीसाठी आखणी करणे गरजेचे आहे, तेंव्हा जमिनीची आखणी करण्यापूर्वी लागवडीची पद्धत ठरवावी. फळपिके लागवडीच्या चौरस, आयताकृती, त्रिकोणी, षटकोनी, उतार(कंटूर) अशा निरनिराळ्या पद्धती आहेत. चौरस पद्धत ही सर्वात सोपी,आखणीस अडचण नसणारी आणि उभ्या-आडव्या मशागतीस योग्य अशी पद्धत प्रामुख्याने सर्वत्र वापरली जाते,आंबा, पेरू, चिकू, संत्रा, मोसंबी इत्यादी फळझाडांची लागवड या पद्धतीने केली जाते. या पद्धतीमध्ये झाडांच्या रांगा काटकोन करून असतात. दोन झाडातील आणि दोन रोपातील अंतर सारखेच येत असल्यामुळे झाडे सर्व दिशांनी पाहिल्यास सारख्या अंतरावर दिसतात. या पद्धतीने लागवड करणे अत्यंत सुलभ असते.

फळबाग लागवडीचे अंतर :विविध फळझाडांसाठी खड्डा खोदणे आणि भरणे महत्वाचे, त्याकरिता खड्ड्याचा आकार किती असावा ? हे खड्डे केंव्हा घ्यावेत? आणि केंव्हा भरावेत आणि कसे ?जेथे फळझाडांची लागवड करावयाची आहे,तेथे योग्य त्या अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत.जमिनीच्या मगदुराप्रमाणे आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्याचा आकार ठरवावा.खड्डे खोदण्याचे काम उशिरात उशिरा एप्रिल महिन्यात पूर्ण करावे. सर्व साधारणपणे मोठ्या आकाराचे खड्डे हलक्या जमिनीत व मोठया विस्ताराच्या झाडासाठी घ्यावेत.दीर्घायुषी झाडे असतील तर १ बाय १ बाय १ मी. आकाराचा खड्डा घ्यावा. मध्यम आकारच्या झाडांना ७५ बाय ७५ बाय ७५ से. मी. व लहान झाडांना ६० बाय ६० बाय ६० से.मी आकारचे खड्डे घ्यावेत. जमीन डोंगर उतारची असेल तर समपातळी रेषा काढून त्याप्रमाणे लागवड करावी.

### जागतिक दिवस:
### जागतिक पर्यावरण दिन
### जागतिक प्रजातीवाद विरोधी दिन

#### महत्वाच्या घटना

१९०७ : स्वामीनारायण पंथाची स्थापना.
१९५२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही सन्मान पदवी दिली.
१९१५ : डेन्मार्कमधे महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.
१९५९ : सिंगापूरमधील पहिल्या सरकारची स्थापना झाली.
१९६८ : अमेरिकेच्या अध्यक्षपदचे उमेदवार रॉबर्ट एफ. केनेडी यांचा गोळी मारण्यात आली, पुढील दिवशी केनेडी मरण पावले.
१९७५ : १९६७ पासून आठ वर्षे वाहतूकीसाठी बंद असलेला 'सुवेझ कालवा'पुन्हा आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुला करण्यात आला..
१९७७ : सेशेल्समधे उठाव झाला.
१९८०: भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक व ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे एक संस्थापक नारायण मल्हार जोशी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात आले.
१९९४ : वेस्ट इंडिजच्या ब्रायन लाराने इंग्लिश कौटी क्रिकेट स्पर्धेत वॉरविकशायरकडून खेळताना नाबाद ५०१ धावा करून प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : पाकिस्तान आणि भारतामध्ये तीव्र उष्णतेची लाट आल्यामुळे तापमान ५० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त झाले.
२०१७ : जीएसएलवी मार्क ३ च्या पहिल्या विकसात्माक उड्डाणाच्या सहाय्याने इसरोने जीसैट-१९ चे सफलतापूर्वक प्रक्षेपण केले.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ते ॲडॅम स्मिथ . (मृत्यू: १७ जुलै १७९०)
१८७९ : भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक नारायण मल्हार जोशी . (मृत्यू: ३० मे १९५५)
१८८१ : हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार गोविंदराव टेंबे . (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९५५)
१८८३ : ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मायनार्ड केन्स . (मृत्यू: २१ एप्रिल १९४६)
१९०० : डेनिस गॅबॉर, हंगेरीयन, ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९०८ : कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे सहसंस्थापक रवि नारायण रेड्डी . (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९१)
१९४५ : अंबर रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९४६ : विल्यम्स एफ टीम चे सहसंस्थापक पॅट्रिक हेड यांचा जन्म.
१९५० : हरिश्चंद्र माधव बिराजदार, मराठी पहिलवानी कुस्तीगीर.
१९६१ : भारतीय टेनिस खेळाडू आणि प्रशिक्षक रमेश कृष्णन.
१९७२ : भारतीय योगी आणि राजकारणी योगी आदित्यनाथ.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१६ : लॉर्ड होरेशियो किचनर, ब्रिटीश फील्ड मार्शल, भारताचा व्हाईसरॉय.
१९५० : कुस्तीगीर व प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार . (जन्म: १४ सप्टेंबर २०११)
१९७३ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर तथा श्री गुरूजी यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९०६)
१९९६ : भारतीय कवि आणि विद्वान आचार्य कुबेर नाथ राय . (जन्म: २६ मार्च १९३३)
१९८७ : ग. ह. खरे, इतिहासतज्ज्ञ.
१९९९ : राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे शाहूमहाराज भोसले .
२००४ : अभिनेते आणि अमेरिकेचे ४० वे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन (जन्म: ६ फेब्रुवारी १९११)

# शेतकरी सन्मान निधी'ची ई-केवायसी ३० जूनपूर्वी पूर्ण करा




मुंबई : पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व पात्र शेतकऱ्यांनी पुढील हप्ता अखंडितपणे मिळण्यासाठी ३० जूनपूर्वी वार्षिक ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत ई-केवायसी न केल्यास संबंधित शेतकरी पुढील हप्त्यापासून वंचित राहू शकतात, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

योजनेत पारदर्शकता आणणे, गळती रोखणे आणि शासनाचे अर्थसाहाय्य केवळ पात्र व जिवंत लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावे, हा या मोहिमेमागील मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यासाठी राज्यभरात २० मे २०२६ पासून विशेष मोहीम सुरू करण्यात आली असून गावपातळीवर जनजागृतीही केली जात आहे. ३० जून ही ई-केवायसी प्रक्रियेची अंतिम मुदत आहे. मुदतीत प्रक्रिया पूर्ण न झाल्यास आगामी हप्ते तांत्रिक कारणास्तव थांबवले जाऊ शकतात. त्यामुळे सर्व पात्र शेतकऱ्यांनी तातडीने ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. वृद्ध, आजारी किंवा दिव्यांग लाभार्थ्यांना केंद्रावर जाणे शक्य नसल्यास शासनाने विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. गावस्तरीय नोडल अधिकारी आणि क्षेत्रीय कर्मचारी अशा लाभार्थ्यांच्या घरी जाऊन 'फेस ऑथेंटिकेशन'द्वारे ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत करणार आहेत.

# सायकलचे महत्व आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे-जिल्हाधिकारी

## जागतिक सायकल दिन रॅली संपन्न



जालना। प्रतिनिधी

जागतिक सायकल दिनानिमित्त जिल्हा प्रशासन, जालना यांच्या वतीने आज आयोजित करण्यात आलेल्या भव्य सायकल रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, आर. परिविक्षाधीन रंगमंजू भा.प्र.से.,अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, सर्व उपजिल्हांधिकारी मनिषा देशपांडे, मनिषा दांडगे, सुकेशीनी पगारे व तहसिलदार छाया पवार, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पोलीस विभाग, एसआरपीएफ, माय भारत उपक्रम, इंडियन मेडिकल असोसिएशन , विविध सायकलिंग ग्रुप्स, व्यावसायिक, उद्योजक तसेच नागरिक मोठ्या संख्येने या सायकल रॅलीत सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हायधिकारी आशिमा मित्तल यांनी सायकलचे महत्व, पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने महत्व याअनुषंगाने उपस्थितांस मार्गदर्शन केले. सायकलचा दैनंदिन जीवनात अधिकाधिक वापर करून पर्यावरणपूरक व निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.याप्रसंगी जालना जिल्ह्यातील कैलास झोळगे यांनी आयर्नमॅन ही जागतिक स्तरावरील व्ही एतनाम येथे आयोजित अत्यंत कठीण व प्रतिष्ठेची क्रीडा स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल श्रीमती मित्तल यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. ''सायकल चालवा, पर्यावरण वाचवा आणि आरोग्य वाढवा'' हा संदेश देण्यासाठी आज आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीला सर्व वयोगटातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सायकल रॅलीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी हिरवा झेंडा दाखवुन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून सुरुवात करुन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही रॅली सिव्हिल क्लब (आझाद मैदान) येथे यशस्वीरित्या संपन्न झाली.याच अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आरोग्य जनजागृतीसाठी रक्त तपासणी ( –) शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये अधिकारी, कर्मचारी तसेच उपस्थित नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या. निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला आरोग्य तपासणी शिबिरामुळे अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले होते.सदर सायकल रॅलीचे वाहतूक नियोजन व सहभागींच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाने अत्यंत मोलाचे सहकार्य केले. रॅली दरम्यान वाहतुकीचे प्रभावी नियमन, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि सुरक्षेची योग्य काळजी घेऊन पोलीस विभागाने कार्यक्रमाच्या यशस्वितेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी सर्व प्रशासकीय विभाग, विविध सायकलींग ग्रुप्स, इंडीयन मेडीकल असोसिएशन, व्या वसायिक, उद्योजक व उपस्थित नागरिकांचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आला

# भुतेकर यांच्यावरील हल्ला प्रकरणी पत्रकार संघाकडून पोलीस प्रशासनाला निवेदन



मंठा। प्रतिनिधी

संपादक संतोष भुतेकर यांच्यावर गुटखा माफियांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा मंठा येथील पत्रकार बांधवांच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ पत्रकारांनी मंठा पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांना निवेदन सादर केले. तसेच आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी केली.निवेदनात नमूद करण्यात आले की, अवैध धंद्यांविरोधात वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांवर हल्ले होणे ही अत्यंत गंभीर व लोकशाहीविरोधी बाब आहे. समाजातील गैरप्रकार उघडकीस आणण्याचे काम करणाऱ्या पत्रकारांवर अशा प्रकारे हल्ले होत असतील, तर ते लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावरच आघात असल्याचे पत्रकारांनी म्हटले आहे.

यावेळी पत्रकारांच्या सुरक्षेसाठी पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. अवैध गुटखा विक्री करणाऱ्या माफियांविरुद्ध पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अन्यथा मंठा तालुक्यातील पत्रकार बांधवांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.यावेळी हरिराम तिवारी (बाबुजी), पंडित बोराडे, नागेश कुलकर्णी, कृष्णा भावसार, संतोष दायमा, राजेभाऊ भुतेकर, प्रदीप देशमुख, दिनेश जोशी, बालाजी कुलकर्णी, डॉ. आशिष तिवारी, अनिल खंदारे, रणजीत बोराडे, रवी भावसार, रमेश देशपांडे, अतुल खरात, डॉ. शबाब बागवान, गजानन माळकर, सुरेश दवणे, मानसिंह बोराडे, जीवन काळे, संदीप गायकवाड, महादेव पाखरे, रवी बोराडे, जगदीश राठोड, आसाराम शेळके, विशाल वायाळ, शुभम बोराडे, दिलीप हिवाळे यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.



# पंतप्रधान आवास योजनाच्या लाभार्थ्यांनी बांधकाम तत्काळ करावे- मुख्याधिकारी

अंबड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत नगर परिषद अंबड हद्दीमध्ये सुरू असलेल्या घरकुल बांधकामांची रोजी मा. मुख्याधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित लाभार्थ्यांशी संवाद साधून बांधकामाची प्रगती जाणून घेतली. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत एकूण १५८ लाभार्थी यांचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून त्यातील फक्त २६ लाभार्थी यांचे बांधकाम पूर्ण आहे. परंतु इतर लाभार्थी यांचे बांधकाम अपूर्ण असून त्यामुळे निधी प्राप्त होण्यास अडचण येत आहेत.

तसेच त्यांनी सांगितले की, सदर योजना अंतिम टप्प्यात असून तिची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत आहे. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी निर्धारित मुदतीपूर्वी आपले घरकुल बांधकाम पूर्ण करून नगर परिषदेमार्फत निधी मागणीची कार्यवाही तात्काळ करावी. अन्यथा मुदतीनंतर निधी शासनाकडून प्राप्त होणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी होळकर नगर मधील लाभार्थ्यांच्या घराची पाहणी केली आणि तात्काळ घरकुले पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना सूचना केल्या. यावेळी मुख्याधिकारी यांच्या सोबत अंबड नगर परिषद सभापती श्री.सचिन घरात , नगर परिषद कर्मचारी श्री. ज्ञानेश्वर शेळके , मुकादम श्री. गौतम कटरमल, श्री. धनंजय गुळवणे सर इत्यादी उपस्थित होते

# अंबड बसस्थानकामध्ये एसटी महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन साजरा



अंबड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आज (ता. १) सोमवारी अंबड बसस्थानकामध्ये ७८ वा एस.टी. महामंडळ वर्धापन दिन अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी विभागाचे विभागीय वाहतूक अधीक्षक श्री. यो.ब.गीते,आगार प्रमुख श्री. विश्वजीत तेली, स्थानक प्रमुख विकास चव्हाण, कार्यशाळा धीक्षक प्रवीण इलग आणि वाहतूक निरीक्षक श्री. तारगे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बसस्थानकावरील प्रवासी तसेच कर्तव्य बजावत असलेल्या एस.टी. कर्मचाऱ्यांना गुलाब पुष्प देऊन आणि पेढे भरवून त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. महामंडळाच्या प्रगतीत प्रवाशांचे सहकार्य आणि कर्मचाऱ्यांचे कष्ट किती मोलाचे आहेत, याची कृतज्ञता या माध्यमातून व्यक्त करण्यात आली.

या प्रसंगी बोलतांना विभागीय वाहतूक अधीक्षक श्री.यो.ब.गीते व आगार प्रमुख श्री. विश्वजीत तेली यांनी प्रवाशांना एस.टी. महामंडळाच्या विविध योजनांची माहिती दिली. खाजगी वाहनांच्या तुलनेत एस.टी.चा प्रवास अत्यंत सुरक्षित आणि विश्वासार्ह कसा आहे, याबाबत प्रवाशांचे प्रबोधन करण्यात आले. महिलांसाठी ५० टक्के तिकीट सवलत, ज्येष्ठ नागरिकांना मिळणारी सवलत तसेच इतर सामाजिक घटकांसाठी असणाऱ्या सवलतींची माहिती देऊन प्रवाशांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. महामंडळाकडून चालवल्या जाणाऱ्या धार्मिक व पर्यटन विशेष बसेसची माहिती देऊन नागरिकांनी प्रवासासाठी केवळ एस.टी.लाच पसंती द्यावी, असे आवाहनही या अधिकाऱ्यांनी केले.बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य जपत अहोरात्र सेवा देणाऱ्या एस.टी. महामंडळाच्या या कार्यक्रमाचे साक्षीदार स्थानिक प्रवासी आणि कर्मचारी बनले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अंबड आगारातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले. या प्रसंगी केशव कावळे, शेख मुनीर, श्री.जोशी, श्री. टकले, श्री.बुधनर, श्री. ठोके, श्री. नाटकर, श्री.चव्हाण, श्रीमती पुंडलिक, श्रीमती वडगावकर, श्री. शकील, श्री. बुंदेलखंडे, श्री. खान, श्री. डोईजड, श्री. नाईक यांच्यासह चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी आणि मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते.

# डॉ. ओमप्रकाश शेटे सर्वसामान्य रुग्णांसाठी देवदूत–डॉ. रमेश तारगे




जालना। प्रतिनिधी

तांत्रीक अडचणी दूर करून रुग्णांना मोफत उपचार मिळवून देण्यात शेटे सरांच्या टीमचे मोठे योगदान आहे. आजच्या घडीला वैद्यकीय क्षेत्रात रुग्ण हा एक प्रकारे ग्राहक बनला आहे. काही रुग्णालयांमध्ये उत्तम सेवा मिळत असली, तरी अनेक ठिकाणी शासकीय योजना असूनही केवळ तांत्रिक अडचणींमुळे रुग्णांना योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागते. परिणामी, गरीब रुग्णांची आर्थिक पिळवणूक होते. अशा अत्यंत बिकट परिस्थितीत आयुष्मान भारत योजनेचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेट्ये हे सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांसाठी खऱ्या अर्थाने देवदूत ठरत आहेत,'' असे प्रतिपादन डॉ. रमेश तारगे यांनी व्यक्त केले.

आयुष्मान भारत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल आणि डॉ. ओमप्रकाश शेट्ये यांच्या सेवाकार्याबद्दल गौरवोद्गार काढले. रात्री–बेरात्री मदतीला धावणारे नेतृत्व आहे. आर्थिक विवंचनेत असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी डॉ. शेट्ये यांच्याशी केलेला केवळ एक संपर्कही संजीवनी ठरणारा आहे. त्यांच्याशी रात्री–बेरात्री कधीही संपर्क साधला, तरी ते अत्यंत तत्परतेने संबंधित जिल्ह्याच्या समन्वयकांशी बोलून रुग्णाला मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून देतात. अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही त्यांच्या संवेदनशीलतेमुळे शक्य होत आहेत. करोडो रुपयांची संपत्ती कमवण्यापेक्षा, लाखो लोकांचे आशीर्वाद मिळवून शेट्ये सर जे पुण्याचे काम करत आहेत, ते थक्क करणारे आहे. डॉ. ओमप्रकाश शेट्ये आणि त्यांची संपूर्ण टीम ज्या निष्ठेने हे सेवाकार्य करत आहे, त्यामुळेच जालना जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आयुष्मान भारत ही शासनाची कल्याणकारी योजना यशस्वीपणे राबवली जात आहे. एका योग्य आणि कार्यक्षम माणसाची या पदावर नियुक्ती करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला निर्णय आज फळास येत आहे. यामुळे राज्यातील लाखो गरीब व गरजू रुग्णांना थेट लाभ मिळत आहे,'' असेही डॉ. तारगे यांनी शेवटी नमूद केले. शेटे यांच्या या अविरत सेवाकार्यामुळे हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळत असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रौढ पोषण कार्यशाळा



जालना। प्रतिनिधी

आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष टाळण्यासाठी आणि एका निरोगी समाजाची निर्मिती करण्यासाठी, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे आज ३ जून रोजी वेळेत प्रौढांमधील पोषणया विषयावर एका विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख मार्गदर्शन आणि उपस्थिती या कार्यशाळेचे अध्यक्षपद जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी मा. श्रीमती आशिमा मित्तल भा.प्र.से. यांनी भूषवले. उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी निरोगी आणि संतुलित आहाराचे दैनंदिन जीवनातील महत्त्व विशद केले व उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनी संतुलित पोषक आहार बाबत आज पासून संकल्प करण्याचा निर्धार करावा असे आवाहन केले.

तसेच या कार्यक्रमास प्रामुख्याने खालील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते श्री. रमेश मिसळ अपर जिल्हाधिकारी, श्री. शशिकांत हदगल निवासी उपजिल्हाधिकारी, जालना ✻श्रीमती सुकेशिनी पगारे जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्री. पद्माकर गायकवाड उपविभागीय अधिकारी या मान्यवरांसह जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि मुख्य विषय कार्यशाळेमध्ये मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. देवजी पाटीलयांनी उपस्थितांना अत्यंत सोप्या भाषेत आरोग्याची गुरुकिल्ली समजावून सांगितली. कार्यशाळेत खालील महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले संतुलित आहाराचे महत्त्व दैनंदिन जेवणात प्रथिने, जीवनसत्त्वे आणि इतर घटकांचा समतोल कसा साधावा. प्रौढांमधील पोषणाची गरज वयानुसार शरीराची बदलणारी गरज आणि पोषण. जीवनशैलीजन्य आजार व आहार व्यवस्थापन चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयींमुळे होणारे आजार कसे टाळावेत. मधुमेह, उच्च रक्तदाब (बीपी) व स्थूलता (लठ्ठपणा) प्रतिबंध आहारावर नियंत्रण ठेवून या आजारांना कसे दूर ठेवावे.

निरोगी जीवनशैलीसाठी पोषण मार्गदर्शन दीर्घायुषी व उत्साही राहण्यासाठी घ्यावयाची काळजी. दैनंदिन पोषण मूल्य मोजण्यासाठी विशेष चार्टचे वाटप कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतःच्या दैनंदिन आहारातील प्रथिनांचे आणि कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण मोजता यावे, यासाठी एक विशेष गणना चार्ट तक्ता वाटण्यात आला. या तक्त्यामध्ये रोजच्या जेवणातील घटक जसे की मोड आलेली कडधान्ये, डाळी, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ पनीर, दही. तृणधान्ये गहू, तांदूळ, मका) आणि विविध मिलेट्स .बाजरी, ज्वारी, नाचणी, भगर. हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, अंडी, मांस आणि फळे (केळी, द्राक्षे, आंबा, स्ट्रॉबेरी). या सर्वांमधून शरीराला किती ग्रॅम प्रथिने, एकूण कार्बोहायड्रेट्स मिळतात आणि त्यात साखरेच्या चमच्यांची संख्या किती असते, याची अत्यंत अचूक आकडेवारी घरगुती मापांसह (उदा. १ वाटी, १ ग्लास, १ चमचा) देण्यात आली आहे.

हा तक्ता उपस्थितांना त्यांच्या दैनंदिन आहाराचे नियोजन करण्यास अत्यंत फायदेशीर ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. समारोप (सकस खा, निरोगी रहा) हा संदेश देत, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेत कामाचा ताण हलका करावा, या उद्देशाने घेतलेली ही कार्यशाळा आज संपन्न झाली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.०५ जून २०२६


# ना.पंकजाताई मुंडेंचा अंबाजोगाईत जनता दरबार

## जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण,वरवटीच्या गोशाळेची केली पाहणी; शहरात विविध ठिकाणी दिल्या भेटी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शहरातील जनसंपर्क कार्यालयात जनता दरबार घेऊन जनतेच्या समस्यांचा जागेवर निपटारा केला. ना. पंकजाताई मुंडे यांचे आज दुपारी शहरात आगमन झाले. विविध ठिकाणी भेटी घेतल्यानंतर त्यांनी प्रशांतनगर भागात नव्यानेच सुरू केलेल्या जनसंपर्क कार्यालयात जनता दरबार घेतला. त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांनी यावेळी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांच्या कामाचे पत्र असतील, फोन असतील किंवा वैयक्तिक काम असेल ते त्यांनी जागेवरच सोडविले.

**जनतेसाठी शिस्तबद्ध नियोजन**

कामे घेऊन येणारांची दरवेळेस होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेऊन ना. पंकजाताईंनी भेटीचे शिस्तबद्ध नियोजन केले आहे. प्रचंड गर्दीमुळे नियोजन कोलमडते, हा अनुभव पाहून आलेल्या प्रत्येकाचे काम मार्गी लागले जावे, त्यांचे प्रश्न ऐकले जावेत यासाठी अंबाजोगाईत जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले



आहे.परळी मतदारसंघाचा काही भाग अंबाजोगाई तालुक्यात येत असल्याने आणि केज तालुकासुध्दा जवळ असल्याने दोन्ही भागातील जनतेची सोय याठिकाणी झाली आहे. पंकजाताईंच्या जनता दरबार संकल्पनेचे नागरिकांनी स्वागत करून समाधान व्यक्त केले आहे.

**वरवटीच्या गोशाळेला भेट**

अंबाजोगाईकडे जाताना रस्त्यात वरवटी येथे ॲड अशोक मुंडे यांच्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे गोरक्षण शाळेला भेट देऊन ना. पंकजाताईंनी येथील विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. गाईच्या शेण आणि गोमूत्रापासून तयार करण्यात आलेल्या उत्पादनांची पाहणी करून कौतुक केले. आधुनिक पध्दतीच्या गोकाष्ठ सयंत्राचे उदघाटन त्यांनी याप्रसंगी केले.

**नंदकिशोर मुंदडा, रामभाऊ कुलकर्णी यांच्या निवासस्थानी भेट**

ना. पंकजाताईंनी दुपारी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या तब्येतीची आस्थेने विचारपूस केली.भाजपचे प्रदेश प्रवक्ते रामभाऊ कुलकर्णी यांच्या निवासस्थानी देखील ना.पंकजाताईंनी भेट दिली. रामभाऊ यांच्या मुलाच्या लग्नाला उपस्थित राहू शकल्या नसल्याने आजच्या दौऱ्यात त्यांच्या घरी जावून नवदामप्त्यांना शुभाशीर्वाद दिले.

**दोडतले, भंसाळी परिवाराचे केले सांत्वन**

शेळी मेंढी विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष बालासाहेब दोडतले यांच्या मातोश्री कमलबाई तसेच पुरूषोत्तम भन्साळी यांच्या मातोश्री शकुंतलाबाई यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. आज शहरात आल्यानंतर या दोन्ही परिवाराच्या घरी जाऊन ना. पंकजाताईंनी त्यांचे सांत्वन केले.

# बालेपीर मस्जिदजवळ रखडलेले सिमेंट रस्त्याचे काम सुरू

## भाजपचे डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यामुळे यंत्रणा लागली कामाला

बीड । प्रतिनिधी

शहरातून जाणाऱ्या अहिल्यानगर रोडवरील बालेपीर मस्जिद परिसरात गेल्या वर्षभरापासून रखडलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामामुळे स्थानिक नागरिकांसह वाहनधारकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत होते. या प्रश्नाची दखल घेत भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह शिष्टमंडळाने काही दिवसांपूर्वी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते. अखेर रखडलेले सिमेंट रस्त्याचे काम सुरू झाल्याने नागरिकांमधून समाधान



व्यक्त केले जात आहे.


बालेपीर मस्जिद परिसरात रखडलेल्या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर डॉ.क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून अखेर रखडलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. त्याबद्दल डॉ. क्षीरसागर यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. राष्ट्रीय महामार्ग विभागाचे उपअभियंता राजेंद्र भोपळे यांच्या उपस्थितीत डॉ.क्षीरसागर यांनी कामाची पाहणी केली. यावेळी कामाची गुणवत्ता व गती कायम राखण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. याप्रसंगी नगरसेवक शुभम धूत, मंगेश धोंगडे, राजेंद्र गुजर, मुस्तफा सय्यद, आबा गुजर, श्री गवते यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### मंत्री पंकजाताईंनी दिलेला शब्द गोपीनाथ गडावरून केला पूर्ण

# दिवंगत हाजी एजाज देशमुख यांच्या कुटुंबियांना ५ लाखांचा धनादेश सुपूर्द

बीड । प्रतिनिधी

राज्य भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष दिवंगत हाजी एजाज देशमुख यांच्या निधनानंतर बीड येथे झालेला शोकसभेत पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी देशमुख कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथी दिनी ना. पंकजाताईंनी गोपीनाथ गडावरून हा शब्द पूर्ण करत दिवंगत हाजी एजाज देशमुख यांच्या कुटुंबीयांना पाच लाख



सलीम जहाँगीर यांचा पाठपुरावा; गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून मदतीचा हात


रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपुर्द केला. दिवंगत एजाज देशमुख यांच्या मुलाच्या हाती धनादेश देत बेटा, आम्मी का ध्यान रखना असा सल्ला देत ना. पंकजाताईंनी देशमुख कुटुंबियाप्रती असलेला स्नेह दाखवून दिला. देशमुख कुटुंबियांना मदत मिळावी यासाठी भाजपचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी पाठपुरावा करत गोपीनाथराव मुंडे साहेब प्रतिष्ठानच्या माध्यमातून मदत मिळवून दिली.

परळी तालुक्यातील गोपीनाथ गडावर ◀◀ पान ३ वर

# हुंड्यासाठी विवाहितेची गळफास घेत आत्महत्या

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील २० वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवार (दि.३)रोजी रात्री उघडकीस आली आहे. या प्रकरणी मृत विवाहितेच्या माहेरच्यांनी पती, सासू-सासरे, दीर, जाऊ आणि नणंद यांच्यावर हुंड्यासाठी आणि पैशांच्या मागणीमुळे मानसिक व शारीरिक छळ केल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली आहे. पूजा प्रमोद सुरवसे असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे.



पूजाने गेवराई शहरातील गजानन नगर परिसरात राहत्या घरी साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेच्या दिवशी तिच्या कुटुंबीयांशी संपर्क झाला होता. त्यानंतर सायंकाळी तिच्या वडिलांना फोन करून मुलीने आत्महत्या केल्याची माहिती दिली. घटनेनंतर कुटुंबीयांनी तातडीने गेवराई येथील शासकीय रुग्णालय गाठले असता तेथे पूजाचा मृतदेह आढळून आला. मृत महिलेच्या भावाने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, लग्नानंतर पती प्रमोद साईनाथ सुरवसे, सासरे साईनाथ बापुराव सुरवसे, सासू उषाबाई उर्फ जिजी साईनाथ सुरवसे, दीर गणेश साईनाथ सुरवसे, जाऊ आरती गणेश सुरवसे आणि नणंद अर्चना तुळसे यांनी व्यवसायासाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी करत सतत मानसिक व शारीरिक छळ केला. या त्रासाला कंटाळून पूजाने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप ◀◀ पान ३ वर

# परळीतील 'त्या' मृत्यूचे गूढ उकलले; पैशांच्या वादातून मित्रांनीच केला खून, स्थानिक गुन्हे शाखेकडून ४८ तासांत आरोपी जेरबंद

बीड / परळी । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ येथील लेंडेवाडी शिवारात रेल्वे रुळावर सापडलेल्या तरुणाच्या मृतदेहाचे गूढ उकलण्यात बीड स्थानिक गुन्हे शाखेला (डउइ) अवघ्या ४८ तासांत यश आले आहे. सुरुवातीला आत्महत्या वाटणारी ही घटना प्रत्यक्षात पैशांच्या देवाणघेवाणीतून झालेला निर्घृण खून असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी मयताच्या दोन मित्रांना पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे.

अफजलखान उर्फ तोहीद कैरातीखान पठाण (वय ३६ वर्षे, रा. सरदारनगर, परळी वै.) असे



खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर ऋषीकेश परमेश्वर फड (वय २७ वर्षे, रा. सोमेश्वर नगर, परळी) आणि गौरव दिपक व्यास (वय २६ वर्षे, रा. स्नेहनगर, परळी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपी मित्रांची नावे आहेत.

**सुरुवातीला वाटली आत्महत्या, पण...**

मिळालेल्या माहितीनुसार, मयत अफजलखान हा ३१ मे रोजी त्याच्या मित्रांसोबत बाहेरगावी गेला होता, मात्र तो दोन दिवस घरी परतला नाही. त्यानंतर १ जून रोजी सकाळी ९:३० वाजेच्या सुमारास लेंडेवाडी शिवारातील रेल्वे रुळावर त्याचा मृतदेह आढळून आला. प्रथमदर्शनी ही आत्महत्या असावी असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, स्थानिक गुन्हे शाखेने या घटनेचा बारकाईने तपास सुरू केला.

**गुढ उकलले अन् आरोपी जाळ्यात अडकले**

तपास सुरू असतानाच गुन्हे शाखेला गुप्त बातमीदार आणि मयताच्या नातेवाईकांकडून काही संशयास्पद माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी घटनास्थळाच्या आजूबाजूचे सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषण याद्वारे तपासाची चक्रे वेगवान केली. ३ जून रोजी हे दोन्ही आरोपी परळीत आल्याची गोपनीय माहिती मिळताच, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून त्यांना शिताफीने ताब्यात घेतले.

**दगडाने ठेचून केला खून**

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पैशांच्या ◀◀ पान ३ वर

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची विटंबना थांबवा : स्मारकाचे पावित्र्य राखा-दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

शहराच्या मध्यभागी नवीन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे मोठ्या थाटात उदघाटन करण्यात आले होते. सदरील समारकाच्या चौथाऱ्याची दुरावस्था झाल्याने राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

नवीन बस थांबाच्या परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम सुरु असून, स्मारकाच्या चौथाऱ्याचे काम पूर्ण झालेलं असून, सदरील चौथाऱ्याच्या कामात अर्थपूर्ण



### राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन : बांधकामाची चौकशीची मागणी

भ्रस्टाचार झालेला असून, निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यात आल्यामुळे सदरील चौथाऱ्याच्या बांधकाम वरील फरशी गळून पडली आहे,त्याच्यामुळे गुत्तेदार यांची चौकशी करून योग्य ती फौजदारी कार्यवाही करण्यात यावी तसेच आजू बाजूचा परिसर दुर्गंधी युक्त झाल्याने व नगरपरिषद व एस. टी परिवहन महामंडळ प्रशासन यांच्या हलगर्जी पणा मुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची वारंवार विटंबना होत असून, ही विटंबना तात्काळ थांबवण्यात यावी तसेच स्मारक परिसरात कायम स्वच्छता करून स्मारकास दिवस रात्र पाळीत संरक्षण देण्यासाठी नगरपरिषदने कायम कर्मचारी देण्यात यावे अन्यथा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सदरील निवेदनाद्वारे काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी निवेदणाद्वारे उपविभागीय अधिकारी यांना दिला असून, नागरिकांना स्मारकाचे पावित्र्य राखण्याचे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे ◀◀ पान ३ वर

# जनगणनेच्या राष्ट्रीय कर्तव्यावर जाताना वडवणी येथील अंशतः अनुदानित शिक्षक अपघातात गंभीर जखमी

वडवणी । प्रतिनिधी

महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथील शाळेत अंशतः अनुदानित शिक्षक म्हणून कार्यरत असणारे श्री. विलासजी समर्थ सर हे जनगणनेसाठी प्रगणक म्हणून काम पाहत होते जनगणनेच्या राष्ट्रीय कर्तव्यावर बीड येथून जाताना आज दि.०३/०६/२०२६ बुधवार रोजी ढेकणमोहाच्या पुढे रोडचे काम चालू आहे त्यामुळे रस्ता खराब झाला आहे व समोरून कंटेनर आल्यामुळे मोटरसायकल स्लीप होऊन झालेल्या अपघातामध्ये ते गंभीर जखमी झाले असून सध्या त्यांच्यावर वेलनेस मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल बीड या ठिकाणी खाजगी दवाखान्यात उपचार सुरू आहेत. सध्या

### वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत करावी म्हणून जनगणना अधिकारी व तहसीलदार यांना निवेदन

शाळांना सुट्टी असताना देखील शिक्षक जनगणनेचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडत आहेत भर उन्हात पायपीट,वाहतुकीचा धोका आणि कामकाजाचा तणाव यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे अंशतः अनुदानित शिक्षकांना आरोग्यासाठी कोणतेही वैद्यकीय संरक्षण नाही.

वडवणी येथील अंशतः अनुदानित शिक्षक श्री. विलासजी समर्थ सर यांचे या अपघातात हाताला पायाला मार लागलेला असून एक हात ◀◀ पान ३ वर





# परळीतील तोहीद खान हत्या प्रकरणात दोषींना कठोर शिक्षा द्या -नुमान चाऊस



माजलगाव । प्रतिनिधी

परळी येथील तोहीद खान यांच्या हत्या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी तसेच या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवून पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळवून द्यावा, या मागणीसाठी आज उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांना निवेदन देण्यात आले.

अल्पसंख्यांक मुस्लिम संरक्षण समिती, शेतकरी कामगार पक्ष, मौलाना आझाद युवा मंच, -झउठ आणि जकीबाबा सोशल वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त वतीने हे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी सांगितले की, परळीतील तोहीद खान हत्या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच न्यायालयीन प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणे आवश्यक असल्याचे ◀◀ पान ३ वर

# बीड आगारात राजकीय वरदहस्ताचा आधार, एसटीत भ्रष्ट व्यवहार-सरवदे

बीड । प्रतिनिधी

बीड आगारातील डेपो मॅनेजर यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, त्यांना वारंवार बीड येथेच पोस्टिंग मिळत असल्याने संपूर्ण प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. एका अधिकाऱ्याला सातत्याने एकाच ठिकाणी टिकवून ठेवण्यासाठी नेमके कोणाचे आशीर्वाद आहेत? असा संतप्त सवाल आता कर्मचारी व नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

निलेश पवार यांनी दिनांक १२ एप्रिल २०१८ रोजी बीड आगारात डेपो मॅनेजर म्हणून पदभार स्वीकारला. त्यानंतर नोव्हेंबर २०२१ मध्ये त्यांची बदली करण्यात आली होती. मात्र काही काळातच ती रद्द करून त्यांना पुन्हा बीड येथेच ठेवण्यात आले. सन २०२२ मध्ये त्यांची बुलढाणा येथे बदली झाली, पण ती देखील रहस्यमयरीत्या रद्द करण्यात आली आणि त्यांना पुन्हा बीडमध्ये आणण्यात आले.

इतकेच नव्हे तर सन २०२४ मध्ये पदोन्नतीनंतर त्यांची वर्कशॉपमध्ये ए.एम.ई. पदावर बदली झाली होती. मात्र तरीदेखील त्यांनी बीड आगाराचा मोह सोडला नाही. अखेर सन २०२६ मध्ये पुन्हा त्यांची बीड आगारात डेपो मॅनेजर म्हणून नियुक्ती करण्यात आली. वारंवार एकाच ठिकाणी पोस्टिंग मिळणे ही केवळ योगायोगाची बाब नसून, यामागे मोठ्या आर्थिक व्यवहारांचा संशय व्यक्त केला जात आहे.

निलेश पवार यांनी विभागीय नियंत्रक दुसाने मॅडम यांच्याशी संगनमत करून विभागीय कार्यालयातील विविध पदांचे चार्ज घेतल्याची चर्चा असून, त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आरोप होत आहेत. त्यांच्या विरोधात अनेक तक्रारी दाखल झालेल्या आहेत. विविध चौकशीत त्यांना दोषी ठरवून दोन इन्क्रिमेंट परत घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. म्हणजेच महामंडळाने स्वतः त्यांच्यावर ठपका ठेवलेला असतानाही त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आलेली नाही.

उलट, विभागीय नियंत्रक दुसाने मॅडम आणि संबंधित आर.एम. यांच्याशी आर्थिक व्यवहार करून निलेश पवार यांना बीडमध्येच कायम ठेवण्यात येत असल्याचा गंभीर आरोप आता उघडपणे केला जात आहे.

विशेष म्हणजे, निलेश पवार यांच्या कार्यकाळात बीड आगारातील स्थानिक खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे सांगितले जात आहे. एल.पी. प्रक्रियेत मोठ्या आर्थिक देवाणघेवाणी होत असल्याची माहिती पुढे येत असून, या संपूर्ण प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात आली आहे.

हे प्रकरण केवळ एका अधिकाऱ्यापुरते मर्यादित नसून, एसटी महामंडळाच्या आर्थिक हिताला तडा देणारे आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारे असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. सन २०१८ पासून निलेश पवार यांच्या सर्व बदली आदेशांची चौकशी करण्यात यावी, वारंवार बीड येथेच पोस्टिंग कोणत्या निकषावर देण्यात आली याची माहिती जाहीर करण्यात यावी, स्थानिक खरेदी, एल.पी. प्रक्रिया व आर्थिक व्यवहारांचे स्वतंत्र लेखापरीक्षण करण्यात यावे, विभागीय नियंत्रक दुसाने मॅडम व संबंधित आर.एम. यांच्या भूमिकेची चौकशी करण्यात यावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ प्रशासकीय बदली करण्यात यावी, दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर शिस्तभंग व फौजदारी कारवाई करण्यात यावा असा इशारा वंचितचे मा. जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी दिला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26